
जगांतील मौ




अतिशय मोठीं थडगीं (पृष्ठ १०)

लेखकः—ना. म. पटवर्धन



आ
ग्रीनलंड
एस्किमो
एस्किमो
उत्तर अमेरिका
संयुक्त संस्थानें
ॲटलांटिक
महासागर
सहारा
पॅसिफिक
महासागर
दक्षिण
अमेरिका
पेरू-देश
अंटार्क्टि


र्टिक महासागर
रशिया
यूरोप
इजिप्त
अरबस्तान
चीन
जपान
हिंदु
पॅसिफिक महासागर
आफ्रिका
जळमाणूस
आस्ट्रेलिया
क महासागर
जगाचा नकाशा

No 36 of 1931/32 Rs. 17 8/31

जगांतील मौजा

3/6

लेखक

ना. म. पटवर्धन,

एम्. ए., एल्. टी.

मुख्याध्यापक, अध्यापिकाशाला, हिंगणें.

१९३१

किंमत ६ आणे.

प्रकाशकः– विद्याधर हरि दामले,
प्रोप्रायटर, नवीन किताबखाना,
बुधवार चौक, पुणें २.

[पुनर्मुद्रणासंबंधीं सर्व हक्क लेखकानें आपणाकडे ठेविले आहेत.]

मुद्रकः– श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु आणि कंपनीज प्रेस,
५१३ शनवार पेठ, पुणें २.

प्रस्तावादाखल--

माझे एक मित्र म्हणत असतात कीं, कोणत्याही विषयाचें मनोरंजकत्व मारावयाचें असल्यास तो शाळेच्या अभ्यासक्रमांत घालावा ! या विधानांत थट्टेच्या अतिशयोक्तीपेक्षां सत्यतेचा कठोरपणाच अधिक आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहिली म्हणजे ही गोष्ट नीट कळून येईल. इतिहास विषयच घ्या. अस्सल बखरी, शकावल्या, सनदा, नाणीं, ताम्रपट इत्यादि जिवंत साधनांनीं भूतकाळच्या भुयारांतील संपत्ति संशोधून काढण्यांत जर अपूर्व आनंद वाटतो, तर क्षुद्र व्यक्तींच्या नांवांनीं, सनांच्या आंकड्यांनीं,तहाच्या कायदेबाज कलमांनीं, भिकार नकाशांनीं व चित्रांनीं गिचमडलेला ‘ शालोपयोगी इतिहास ’ म्हणजे एक शाळा सोडल्याशिवाय कधींही न टळणारी आपत्ति आहे असें वाटतें. सृष्टिनिरीक्षणासारखा जगांत दुसरा कोणता आनंददायक व्यापार असूं शकेल ! एखाद्या सुंदर बागेंतून फिरतांना तेथील रंगीबेरंगी सुगंधी फुलें, हिरव्या पिवळ्या पालवीनें तरवरलेलीं झाडें व स्वच्छंद गात उडणारीं पांखरें पाहून कोणाचें हृदय नाचूं लागणार नाहीं ?तथापि, शाळेच्या चार भिंतींच्या आड होत असलेल्या ‘ सृष्टिनिरीक्षणां ’त आपण एकाद्या बागेंत नसून फुलाफळांच्या व पांखरांच्या इस्पितळांत आहोंत असें मुलांना वाटल्याशिवाय रहात नाहीं. मोहक सुगंधाऐवजीं आयडोफार्मची घाणच डोक्यांत शिरून शिसारी यावयाची. गायनानें विषारी साप देखील डोलूं लागतात, यापेक्षां गायनाचें सामर्थ्य पटविण्यास अधिक पुरावा नको. पण शाळेंत गायनमास्तरांच्या देखरेखीखालीं ‘ सरगम ’च्या ज्या उठबशा मुलांना काढी घालावयास लागतात त्यामुळें खवळून त्यांच्यापैकीं कांहींनीं गायनाचा सापाप्रमाणें जन्मभर डाव धरल्यास आश्चर्य करण्याचें कारण नाहीं.

भूगोल या विषयाची हीच दशा झाली आहे. शाळेंत शिकविण्याचा एक विषय या दृष्टीनें भूगोलाकडे पाहिलें म्हणजे त्याच्यासारखा कंटाळवाणा व निरुपयोगी असा दुसरा विषय आढळणार नाहीं. पण व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें तो किती मनोरंजक व आवश्यक आहे हें निराळें सांगावयास नको. भूगोल या विषयाचा उगमच प्रवासाचे

पोटीं झालेला आहे. एवढेंच नव्हे तर भूगोल म्हणजे ज्या दरिद्री व दुर्दैवी प्राण्यांना प्रत्यक्ष डोळ्यांनीं हा अद्भुत भू-गोल पाहण्याची संधि मिळत नाहीं त्यांच्या दृष्टीनें काल्पनिक प्रवासच आहे असें एक ग्रंथकार म्हणतो. भूगोल हा पुस्तकांतून शिकावयाचा नसून प्रवासामधून शिकावयाला पाहिजे. डोक्यापेक्षां पायाच्याच श्रमाचें साफल्य या विषयामध्यें अधिक. तथापि, आजकाल आमच्या शाळेमधून भूगोल ज्या पद्धतीनें शिकविला जातो त्यामुळें पृथ्वीतलावरचा प्रवास घडण्याऐवजीं दुसऱ्या कोणत्यातरी लोकाचा प्रवास मुलांना घडत असल्यास नवल नाहीं. हिमालय पहावयास गेलेला प्रवासी त्या पर्वताचीं बर्फाच्छादित गगनचुंबी शिखरें, तेथील विस्तीर्ण वनराजी व अनेक सौंदर्यस्थळें पाहून तल्लीन होऊन जातो, तर आमच्या भूगोलाच्या विद्यार्थ्याला २९००२फूट उंचीपेक्षां त्या पर्वताचे बाबतींत अधिक कांहीं महत्त्वाची गोष्ट असूं शकेल याची कल्पना नसते. गंगास्नानास जाणारा भाविक यात्रेकरू गंगेचें विस्तीर्ण जलसंपन्न पात्र पाहून, तिच्या कांठचा धनधान्यसमृद्ध प्रदेश अवलोकून थक्क होऊन जातो, तर नकाशांतल्या गंगानदीदर्शक रेघेवरून बोट फिरवतांना गंगोत्रीच्या पोटीं जन्म घेऊन बंगालच्या उपसागरांत उडी टाकण्यापलीकडे गंगेच्या हातून कांहीं लक्ष्यांत ठेवण्यासारखी कामगिरी झाली किंवा नाहीं याबद्दल आमचा छोटा विद्यार्थी बेफिकीर असतो. शालेय भूगोलाचें पुस्तक घेऊन प्रवासाला निघण्याचें कोणींतरी धाडस केलें असेल काय? जर कदाचित् एकाद्या विद्यार्थ्यानें ही गोष्ट करावयाचें मनांत आणलें तर आठ दिवसांचे आंतच 'मुलगा हरवला, दहा रुपये बक्षीस' अशी जाहिरात वर्तमानपत्रांत देण्याची पाळी त्याच्या पालकांवर आल्याखेरीज रहाणार नाहीं. एवंच, भूगोल हा विषय जोंपर्यंत प्रवासाच्या दृष्टीनें शिकविला जात नाहीं, किंवा त्या विषयावरील पुस्तकें तशा हेतूनें लिहिलीं जात नाहींत तोंपर्यंत तो कधींही मनोरंजक वाटणार नाहीं.

दुसऱ्या एका बाजूनें हीच गोष्ट पटवितां येण्यासारखी आहे. प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ सर पर्सी नन् हे नेहमीं म्हणत असतात कीं, एखाद्या विषयाचें अध्यापन मनोरंजक करावयाचें असल्यास तो विषय ज्या अवस्थांमधून

उत्क्रांत झाला असेल त्या अवस्थांच्या अनुक्रमानें शिकविला पाहिजे. सामान्यतः प्रत्येक विषय कौतूहल, उपयुक्तता व शास्त्रीयता या तीन स्थितींमधून जातो. उदाहरणार्थ, लेखनशास्त्राचा जर आपण विचार केला, तर आपणांस असें आढळेल कीं, मनांतला मतलब कांहीं तरी चित्रमय आकृतीच्या द्वारें व्यक्त करतां येतो, या आनंददायक शोधांतून लेखनाचा आरंभ झाला असावा. इजिप्त, चीन व जपान या देशांतील 'चित्रलिपी' पाहिल्या म्हणजे या उपपत्तीला दुजोरा मिळतो. कांहींतरी मौजेची गोष्ट किंवा गंमतीचा खेळ अशा स्वरूपांत लेखनाचा आरंभ झाला. पुढें लेखनाची उपयुक्तता कळूं लागतांच त्यांतील मौजेचा व कौतूहलाचा भाग तितका कमी झाला, व त्याचा व्यवहारांत प्रत्यक्ष अवलंब होऊं लागला. या पुढची स्थिति म्हणजे नक्की लिपिसंकेत ठरविण्यांत आले व लेखनास नियमबद्धता आली. जर लेखन मनोरंजक पद्धतीनें शिकवावयाचें असेल तर तें या क्रमानुरूप शिकवावयास पाहिजे. भूगोल विषयापुरतें बघावयाचें झालें तर असें आढळून येईल कीं, भूगोल विषयाची सुरवातच मुळीं प्रवासांत झाली. स्थलांतर करण्याची प्रवृत्ति मनुष्यांत जन्मजात आहेच. निसर्गानें निर्माण केलेली ही अद्भुत सृष्टि, तिजवरील भिन्न वनस्पति व प्राणिजात पाहण्यांत मनुष्याला अपूर्व आनंद प्रतीत होऊं लागला व त्याच्या मनांत प्रवासाची अभिरुचि उत्पन्न झाली. पुढें पुढें जन्मजात प्रवृत्तीच्या समाधानासाठीं किंवा सृष्टिसौंदर्यावलोकनासाठींच केवळ न हिंडतां तो अन्नसंशोधनाच्या, वसाहतीच्या आणि व्यापाराच्या हेतूनें संचार करूं लागला. अशा तऱ्हेनें सर्व पृथ्वीचा शोध लावणें, तिजवरील हवा, पर्जन्य, उष्णता इत्यादि गोष्टी जाणणें किंवा तिजमधील कोणकोणती खनिज संपत्ति आहे तें शोधून काढणें त्याला अपरिहार्य झालें; व या सर्व ज्ञानाचा भूगोलांत अंतर्भाव होऊन त्याला शास्त्ररूप प्राप्त झालें. तेव्हां, विषयोत्क्रांतिक्रमाच्या दृष्टीनें पाहिलें तरी भूगोल शिकण्याची अगर शिकविण्याची सुरुवात प्रवासीदृष्टीनेंच करावयास हवी. आपण एखाद्या मौजेच्या प्रवासाला निघालों आहोंत असें मुलांना वाटलें पाहिजे. निघण्यापूर्वीची गडबड—धांदल-उत्साह त्यांना प्रत्यक्ष अनुभवावयास मिळाला पाहिजे. त्यांची जिज्ञासा जागृत झाली

पाहिजे. आपणांस कांहींतरी गंमत पहावयास मिळणार या अपेक्षेच्या आनंदानें त्यांचे डोळे नाचूं लागले पाहिजेत. माझी खात्री आहे कीं, या दृष्टीनें भूगोल शिकावण्यास जर सुरुवात झाली तर कांहीं काळ तरी बाकीच्या विषयांना अज्ञातवास पत्करावा लागेल.

भूगोल हा प्रवास ही गोष्ट तर खरीच; पण हा मनुष्यप्राण्याचा प्रवास आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. नाहींतर एकादें शहर पहावयाला म्हणून जावयाचें व तेथील लोक, त्यांची रहाणी, उद्योगधंदे, तेथील दर्शनीय स्थळें वगैरे पहाण्याला विसरावयाचें; आणि त्या शहराची उंची समुद्रसपाटीपासून किती आहे, त्या शहराचें क्षेत्रफळ काय आहे, तेथील लोकसंख्या किती आहे, शेजारीं दंतुर किनारा आहे कीं नाहीं असलीच फक्त माहिती पोतडींत घालून परत येण्याची पाळी यावयाची !

मराठींत अशा दृष्टीनें लिहिलेलीं पुस्तकें जवळ जवळ नाहींतच असें म्हणावयास हरकत नाहीं. आतां कोठें उजाडूं लागलें आहे. गतवर्षींच प्रि. ना. म. पटवर्धन यांनीं 'आमची दिवाळी' नामक एक मनोरंजक पुस्तक प्रसिद्ध करून या कामगिरीस सुंदर सुरवात केली आहे; व त्याच पद्धतीवर प्रस्तुत पुस्तक लिहून ते आतां प्रसिद्ध करीत आहेत. या पुस्तकाचा वेधक मथळा व आंतील प्रकरणांचीं नांवें वाचतांच लेखकाची भूमिका समजते. केवळ सामुद्रधुन्या, आखातें, भूशिरें दाखवावयास तो आपणांस नेत नसून जगांतील कांहींतरी मौजेच्या गोष्टी पहावयास तो नेत आहे असें आपणांस कळून येतें व त्याच्याबरोबर जावेसें वाटतें. या प्रवासाचा मार्ग जगांतील बहुतेक सर्व महत्त्वाच्या देशांतून आंखलेला आहे. प्रत्येक देशांतील काहीं निसर्गनिर्मित अगर मनुष्यकृत वैशिष्ट्य निवडून तें लेखकानें प्रामुख्यानें पुढें मांडलें असल्यानें हें सर्व भटकणें हेतुपूर्वक चाललें आहे असें वाटतें, व त्यामुळें प्रवासाचा उत्साह अधिक वाढतो. स्थलदर्शनाबरोबर मधून मधून इतर पुष्कळच आनुषंगिक उपयुक्त माहिती सांगण्याचा प्रयत्न केला असल्यामुळें डोळ्याबरोबर डोक्याचेंही समाधान होण्याची सोय झालेली आहे. ही सर्व पृथ्वीप्रदक्षिणा पुरी करून आल्यानंतर मुलांच्या डोळ्यापुढें जगाच्या भूगोलाचा संपूर्ण व अखंड आराखडा उभा राहिल्याशिवाय

रहाणार नाहीं. याच आराखड्यांत पुढें विशिष्ट माहितीचा तपशील भरत गेल्यास मुलांना भूगोलाचें खरें मनोरंजक स्वरूप कळून येईल. प्रवासाचा वाटाड्या मिठ्ठास बोलणारा व विनोदी असला म्हणजे मौजेंत आणखी मौज. प्रि. पटवर्धन यांच्या लिखाणांत हा गुण तर प्रामुख्यानें आढळून येतो.

भूगोलाचा अभ्यासक्रम आमूलाग्र बदलण्यासंबंधीं हल्लीं खटपट चालू आहे. नुकत्याच पुणें येथें भरलेल्या भूगोल परिषदेपुढें नवीन पद्धतीनें तयार केलेला भूगोलाचा अभ्यासक्रम मांडण्यांत आला होता. हा अभ्यासक्रम मंजूर झाल्यास प्रस्तुतच्या पुस्तकासारखीं नवीन दृष्टीचीं द्योतक व शिक्षण-शास्त्रांतील नियमांस धरून अशीं पुस्तकें लिहिणें जरूर होईल. वारा कोणत्या दिशेनें वहातो आहे हें आधींच ओळखून प्रि. पटवर्धन यांनीं या कामगिरीस आधींपासूनच सुरुवात करण्याची सावधगिरी बाळगिली याबद्दल त्यांचें अभिनंदन करावयास हवें. यापुढचीं पुस्तकेंहि लिहिण्याचें काम त्यांनीं लौकर हातीं घ्यावें हें इतरांनीं सांगण्याची जरी ते वाट पहाणार नाहींत, तरी त्यांना तसें सांगितल्याशिवाय रहावत नाहीं.

पुणें,
७ जुलै १९३१.

प्रल्हाद केशव अत्रे
बी.ए.,बी.टी.,टी.डी. (लंडन)

आरंभींचे चार शब्द.

सदरहु पुस्तक लिहिण्यांत माझा काय उद्देश आहे हें माझे मित्र कँ.ए.सो.च्या हायस्कूलचे हेडमास्तर रा. प्र. के. अत्रे यांनीं आपल्या 'प्रस्तावादाखल'-मध्यें स्पष्टपणें सांगितलेंच आहे. करितां त्याची फारशी पुनरुक्ति करीत नाहीं. परसांतल्या विहिरींत व गांवच्या गंगेंत पोहतां येऊं लागल्यावरच बंदरच्या दर्यांत पोहावयाचें असतें. परंतु दर्या अगदींच जवळ असेल तर त्यांतही अधून मधून पोहून त्याची तोंडओळख करून घेणें जरूरीचें आहे. तसेंच स्वतःचें गांव, तालुका, जिल्हा, इलाखा, देश, खंड व पृथ्वी अशा क्रमानेंच भूगोल शिकविणें योग्य असलें तरी हल्लीं दळणवळणाचीं साधनें इतकीं सुलभ झालीं आहेत, कीं आपला सर्व व्यवहार आतां पूर्वीप्रमाणें केवळ स्थानिक स्वरूपाचा राहिला नसून त्यांत हरघडी पृथ्वीवरील इतर देशांचाहि संबंध येऊं लागला आहे. मँचेस्टरचें 'मांजरपाट' कापड, ऑस्ट्रेलियाचा गहूं, जपानचा तांदूळ, अमेरिकेंतील तेल, स्विझरलंडचीं घड्याळें, नॉर्वेचा कागद, जर्मनीच्या चाकू कात्र्या, चीनचीं भांडीं अशा अनेक गोष्टींच्या निमित्तानें आपला इतर देशांशीं संबंध येऊन इतर रीतींनींहि आपण बाहेरच्या जगाच्या जास्त जास्तच जवळ येऊं लागलों आहों. या देशांचीं नुसतीं नांवें तरी लहान मुलांच्या कानावरून गेलीं असावीं, ते देश आपल्या देशाचे कोणत्या दिशेला व किती अंतरावर आहेत याची सामान्य कल्पना तरी त्यांना यावी, व लहानपणापासूनच त्यांची दृष्टि व्यापक व्हावी असा एक हेतु भूगोल शिकविण्याच्या नवीन पद्धतीचा आहे. हा हेतु थोड्या फार अंशानें साध्य व्हावा, येवढाच उद्देश मनांत धरून या ' मौजा ' लिहिल्या आहेत. सेकंडरी टीचर्स ट्रेनिंग् कॉलेजचे प्रिन्सिपल् श्री. कार यांना सदर 'मौजांची' मूळ कल्पना व या कल्पनेनुसार लिहिलेल्या पुस्तकांतील वाचून दाखविलेला कांहीं भाग इतका आवडला कीं त्यामुळें या ' मौजा ' पुस्तकरूपानें छापण्यास उत्तेजन मिळालें. या उत्तेजनांतच प्रस्तावनाकार प्र. के. अत्रे, धुळें ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल् रा. कारखानीस व पुणें येथील

ट्रे. कॉ. फॉर मेन् मधील भूगोलविषयाचे शिक्षक रा. नेने यांच्याहि उत्तेजनाची भर पडून पुस्तक छापण्याचें मनांत आणलें. परंतु अद्याप ' आमची दिवाळी ' ही गोष्ट छापतांना जाहलेल्या पैशाच्या होळीची धग कांहीं कमी जाहली नव्हती, आणि म्हणून मनचे मांडे मनांतच खावे लागतात कीं काय अशी भीति पडली होती. परंतु प्रिन्सिपल् कारखानीस यांनीं आपल्या अकारण प्रेमाचा फायदा घेऊं देऊन तीहि अडचण नाहींशी केली, व अशा प्रकारें थोडयाच अवधींत ' आमच्या दिवाळीचें ' हें दुसरें भावंड जन्माला येऊं शकलें. थोरल्या बहिणीप्रमाणें याही भावंडाचें आर्थिक पवितोषिकाच्या दृष्टीनें जरी नाहीं तरी तज्ञांच्या परितोषाच्या दृष्टीनें कौतुक केलें जाईल अशी आशा करणें त्यांच्या जनकाला तरी स्वाभाविक व क्षम्य आहे. नवीन किताबखाना, पुणें, या संस्थेचे मालक रा. दामले व माझे सहकारी मित्र रा. मोने यांनीं हें पुस्तक छापण्याचे व तपासण्याचे कामीं फारच मदत केली याबद्दल इतरांप्रमाणें मी त्यांचाहि आभारी आहें.

अनुक्रमणिका

जगांतील मौजा.

मौज १ ली

दऱ्याखोऱ्यांतील दौलत.

मुलांनों, तुम्ही कधीं मुंबईला गेलां असाल. जातांना खंडाळ्याच्या घाटांतील बोगद्यांतून तुमची गाडी जात असतांना 'कशासाठीं पोटासाठीं; खंडाळ्याच्या घाटासाठीं' हें तिचें तालासुरावरचें गाणें ऐकावें, का बोगद्यांची मजा पहावी असें तुम्हांला होऊन गेलें असेल. केवढाले उंच डोंगर ते! त्यांवरून आगगाडी न्यावयाची असती तर किती कठीण गेलें असतें! परंतु इंजिनिअर लोकांनीं सुरुंगाची दारू, नवीन तऱ्हेवर तयार केलेलीं हत्यारें, यंत्रें, इत्यादिकांच्या योगानें ते डोंगर मारे आरपार पोखरून काढून आगगाडीला इकडून तिकडे जाण्याइतकी रुंद वाट करून दिली आहे. हे डोंगर पोखरण्यास कितीतरी माणसें लागलीं, व तीं कितीतरी दिवस काम करीत होतीं! हे बोगदे पाहून आपणांस साहेबलोकांच्या ज्ञानाचें मोठें कौतुक वाटतें. पण या बोगद्यांपेक्षां जास्त कौशल्याचीं, यांच्यापेक्षां जास्त प्रचंड अशीं कामें आपल्या वाडवडिलांनीं हजारों वर्षांमागें या आपल्या देशांत करून ठेविलीं आहेत, व तीं अद्यापि आपणांस पहावयास सांपडतात. आपल्या पूर्वजांनीं मोठमोठाले डोंगर खोदून त्यांत सुंदर व भव्य इमारती व देवळें तयार केलीं आहेत.

आपण आपलीं नेहमींचीं घरें बांधतांना प्रथम एक मोकळी

जागा पाहतों, व तिच्यावर भिंती, छपरें, दारें, खिडक्या वगैरे सर्व मागाहून उभारून आपलीं निरनिराळीं दालनें, खोल्या वगैरे तयार करतों. वर सांगितलेल्या डोंगरांतील इमारती अशा रीतीनें बांधिलेल्या नाहींत. तर एक मोठा थोरला सोइस्कर डोंगर पाहून तो अशा रीतीनें पोखरावयाचा कीं, आपल्याला जितके मजले, व त्या त्या मजल्यांतून जितकीं दालनें व खोल्या पाहिजेत तितकीं सर्व आपोआप शिल्लक रहावींत. कोण हीं अकलेचीं व कष्टाचीं कामें ! त्या लोकांना तीं करावयाला वेळ तरी किती लागला असेल ! हजारों वर्षांपूर्वीहि सुरुंगाच्या युक्तीचा शोध लावण्याइतके ते लोक शहाणे होते काय ? उलट सुरुंगाच्या मदतीशिवायच त्यांनीं हीं कामें केवळ हत्यारांचे जोरावर केलीं असल्यास त्यांच्या शक्तीचें व चिकाटीचें तर फारच कौतुक केलें पाहिजे.

मुलांनों, अशा प्रकारें कोरून काढलेल्या घरांना किंवा देवळांना ' लेणीं ' म्हणतात. लेणें या शब्दाचा अर्थ दागिना असा आहे. हें नांव या इमारतींना किती चांगलें लागूं पडतें. लेण्यांच्या योगानें भोंवतालच्या दऱ्याखोऱ्यांनाचशी काय, पण सबंध हिंदुस्थानालाही एक प्रकारची शोभा प्राप्त झाली आहे ! हीं लेणीं पांडवांनीं कोरलीं असा लोकांचा समज आहे, व म्हणून त्यांस ' पांडव लेणीं ' म्हणण्याचा प्रघात आहे. पांडव फार शूर व हुषार होते. विशेषतः भीम तर फारच शक्तिमान् असून त्याचे अंगीं मोठमोठे डोंगरसुद्धां फोडण्याची शक्ति होती असें तुम्हीं ' बालभारतांत ' वाचलें असेल. परंतु हीं लेणीं पांडवांनींच बांधलीं असल्याचें मूळ भारतांत सुद्धां कोठें लिहिलेलें नाहीं. लेण्यांतील देवळांपैकीं कांहीं देवळांत शंकर, विष्णु, देवी, राम, कृष्ण वगैरे आर्यधर्मीय लोकांच्या मूर्ति आहेत, तर

कांहींत बुद्धाच्या मूर्ति आहेत. यावरून तीं आर्य व बौद्ध लोकांनीं निरनिराळ्या वेळीं बांधलेलीं आहेत असें होत नाहीं काय? मुलांनों, राम, कृष्ण, वगैरे आपल्या देवांच्या कथा तुम्हांला माहीत आहेतच. हा बुद्धही रामकृष्णांप्रमाणें एक अवतारी पुरुष होऊन गेला. तो प्रथम राजा होता. परंतु गरिबांचीं दुःखें, रोगग्रस्तांचे रोग, व जगांतील निरनिराळ्या प्रकारच्या हानी व नाश पाहून त्याला राज्योपभोगाचा अगदीं तिटकारा आला, व तो एकाद्या संन्याशा-प्रमाणें राहून सर्व लोकांना शांततेनें, समाधानानें व कोणाही प्राण्याला त्रास न देतां राहण्याचा उपदेश करूं लागला. बुद्धाची शिकवणूक व राहणी लोकांना इतकी आवडली कीं, त्याला ते देव मानूं लागले, व त्याच्या शिकवणुकीला धर्माचें स्वरूप प्राप्त झालें. आज जगांत जे मुख्य धर्म आहेत त्यांत बौद्ध धर्म हा एक असून त्या धर्माचे सुमारें ३०–३२ कोट लोक जगांत आहेत.

मुलांनों, हीं लेणीं इतकीं जुनीं, भव्य व कलाकुसरीचीं बांध-लेलीं आहेत कीं, हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत तर तीं प्रसिद्ध आहेतच, परंतु इतर देशांतील लोकही आपल्या देशांत आल्यावर हीं लेणीं पाहिल्यावांचून राहात नाहींत. डोंगरापैकीं मधलाच भाग कांहीं कारणांनीं ढासळून किंवा झिरपून नाहींसा झाल्यामुळें मोठ-मोठ्या खिंडी किंवा दऱ्या आपोआप पडल्याचीं उदाहरणें पृथ्वी-वर पुष्कळ ठिकाणीं आहेत. उदाहरणार्थ, अमेरिकेंत अशाप्रकारें आपोआपच उत्पन्न झालेली एक मोठी दरी असून तिच्यांत एक मैल लांब, पाव मैल रुंद, व तीनशें फूट उंच असें मोठें दालन असल्याचें मीं नुकतेंच वाचलें आहे. परंतु हिंदुस्थानांतील हीं लेणीं स्वाभाविकरीत्याच झालेलीं नसून तीं मनुष्यानें खोदलेलीं आहेत, हें विशेष आहे; व अशा दृष्टीनें पाहतां या लेण्यांइतकीं मोठीं,

कलाकुसरीचीं व चित्रविचित्र पद्धतींनीं नटविलेलीं लेणीं जगांत दुसरीकडे कोठेंहि पहावयास मिळणार नाहींत.

अशा प्रकारचीं लेणीं बंगाल, मुंबई, मद्रास इत्यादि इलाख्यांत थोडीं फार सांपडलीं आहेत. परंतु त्यांतल्यात्यांत आपल्या महाराष्ट्रांत तीं पुष्कळच आहेत, वेरूळ, अजिंठा, कार्लें, घारापुरी इ० ठिकाणचीं लेणीं फारच प्रसिद्ध आहेत. वेरूळ येथील मुख्य दिवाणखान्याची मागील बाजू १०० फूट असून, एकंदर दिवाणखाना २७० फूट लांब व १५४ फूट रुंद एवढा मोठा आहे. तेथील छतकाम व आकार फारच सुंदर व सुबक आहे. हीं लेणीं जशीं त्यांच्या भव्यपणाबद्दल प्रसिद्ध आहेत, तशीं अजिंठ्याचीं लेणीं कलेच्या दृष्टीनें पाहण्यासारखीं आहेत. त्यांत सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यांतील निरनिराळे प्रसंग बहारीनें दाखविले असून खुद्द बुद्धाच्या चरित्रांतील कांहीं ठळक प्रसंगांचीं चित्रेंहि खोदलीं आहेत. हीं चित्रें रंगीत असून तीं रंगवून आज १५०० वर वर्षें होऊन गेलीं असूनही जणूं कालच रंगविलीं आहेत असें वाटतें. कार्ल्यांचीं लेणीं या दोन्हींपेक्षां जुनीं असल्याचें सांगतात. तेथील चैत्य (बौद्धांच्या उपासनेची जागा) आजवर सांपडलेल्या सर्व चैत्यांमध्यें अतिशय विस्तीर्ण आणि सुंदर आहे. मुलांनों, लेण्यांचीं आणखी वर्णनें तुमच्या क्रमिक पुस्तकांतून दिलेलीं आहेत, तीं अवश्य वाचा. शक्य तर तीं प्रत्यक्ष दाखविण्याबद्दल पालकांना किंवा शिक्षकांना विनंति करा. अति परिचयामुळें आपणांस त्यांचें कांहीं वाटत नाहीं. पण त्यांचेमुळेंच आपले पूर्वीचे लोक कलाकौशल्याचे बाबतींत किती पुढें गेले होते, याची जाणीव आपणांस होते, व त्यांबद्दल आपणांस अभिमान व आदर वाटूं लागतो. हिंदुस्थानांत कलाकौशल्याचीं आणखींहि कितीतरी कामें आहेत;

मुसलमानांनीं बांधलेल्या निरनिराळ्या मशिदी, व हिंदुलोकांचीं देवळें त्या त्या लोकांच्या शहाणपणाचीं स्मारकेंच आहेत. ताजमहालासारखी साधी, सुंदर व नाजुक इमारत पृथ्वीवर दुसरीकडे पाहावयास मिळावयाची नाहीं, असें सर्व जगभर प्रवास केलेले प्रवासी सांगतात. परंतु ताजमहाल अवघा ३०० वर्षांपूर्वींच बांधलेला असून लेणीं ३००० वर्षांपूर्वींचीं तरी असावींत; आणि अर्थातच ताज बांधतांना बांधण्याच्या कलेची व साधनसामुग्रीची जितकी माहिती लोकांना होती तितकी माहिती ३००० वर्षांपूर्वींच्या लोकांना असणें शक्य नाहीं; आणि म्हणून एका अर्थीं हीं लेणीं या इमारतींपेक्षां जास्त महत्वाचीं नाहींत काय ?

मुलांनों, हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच या लेण्यांइतक्याच आणखीहि दुसऱ्या आश्चर्यकारक गोष्टी कांहीं कमी नाहींत. सगळ्या जगांत उंच म्हणून नांवाजलेला हिमालय पर्वत; उन्हाळ्यांत सुद्धां भयंकर पूर येणारी व वर्षांतून दोन दोन, तीन तीन पिकें देऊन आपल्या कांठच्या लोकांना भरपूर अन्नपाणी पुरविणारी 'गंगामाई;' पृथ्वीवरील 'नंदनवन' असा काश्मीर प्रान्त; काळ्या कठीण दगडांचीं नाजुक हातांनीं खोदलेलीं खोदकामें वगैरे कितीतरी आश्चर्यकारक गोष्टी आपल्या ह्या एका हिंदुस्थानांत भरलेल्या आहेत; किंबहुना सबंध हिंदुस्थान हेंच एक जगांतलें आश्चर्य आहे. त्याचा विस्तार, त्यांत दृष्टीस पडणाऱ्या सर्व प्रकारच्या जमिनी व हवा; त्यांत उत्पन्न होणारीं निरनिराळ्या प्रकाचीं झाडें, फुलें, फळें, धान्यें; तसेंच निरनिराळ्या धर्मांचीं व जातींचीं तेथील माणसें; या सर्व गोष्टींचें तिऱ्हाइतांना फार आश्चर्य वाटतें; आणि म्हणूनच ते म्हणतात कीं, एक हिंदुस्थान पाहिलें कीं सगळें जग पाहिल्याचें श्रेय येतें. जणूं कांहीं हिंदुस्थान हा सगळ्या जगाचा एक लहानसा फोटोच आहे!

मौज २ री


वाळवंटांतील जहाज.

" काय ! वाळवंटांतील जहाज ? जहाजाची जरूरी मोठ्या नदींतून किंवा समुद्रांतून जातांना लागते; वाळवंटांतून जातांना जहाज कशाला ? " असें तुम्ही आश्चर्यानें विचाराल. मुलांनों, हें जहाज दुसरें तिसरें कोणतेंही नसून, 'उंटा उंटा कवडी दे, कवडी दे.' असें म्हणत ज्याचे मागें तुम्ही लागतां तो उंटच होय. त्याला जहाज कां म्हणतात हें तुम्हांला पुढें आपोआप कळेलच.

मुलांनों ! आपल्या देशाच्या पश्चिमेस, समुद्रापलीकडे, बऱ्याचशा अंतरावर " अरबस्तान " म्हणून एक देश आहे; तो व त्याचे आसपासचा प्रदेश म्हणजे एक मोठें ओसाड वाळवंट आहे. कोठेंही दृष्टि फेंका. 'वर आकाश व खालीं वाळू' याशिवाय आपणांस तेथें कांहींच दिसणार नाहीं; परंतु अशा ओसाड वाळवंटांतही मधून मधून कांहीं निर्झर असून त्या निर्झरांभोंवतीं सुंदर झाडी असते. अशा ठिकाणांना ओॲसेस् म्हणतात. ओॲसेसूच्या आसपास अरब लोकांची थोडी वसतीही झाली आहे. वसती झाली म्हणजे जाणें-येणें, व्यापार, इत्यादि व्यवहार सुरू होतात. आणि हे करण्याकरितां कांहीं ना कांहीं साधन लागतें. पक्क्या रस्त्यांवर गाड्याघोडीं, आगगाड्या, मोटारी वगैरे वाहनांचा उपयोग होतो; परंतु असल्या या भुसभुशीत वाळवंटांतून जातांयेतांना या साधनांपैकीं एकाही साधनाचा उपयोग होत नाहीं. कारण

या वाळवंटांतील वाळू फार खोल असून येथील मुक्कामांचीं ठिकाणेंही एकमेकांपासून फार अंतरावर असतात; यामुळें सर्व दिवसभर मुसमुशीत वाळूंतून तेथील लोकांना प्रवास करावा लागतो. या सर्व प्रवासांत त्यांना पाणी किंवा झाडझूड यांचें दर्शन-ही होत नाहीं. या वाळवंटांत वरून ऊन फार कडक पडतें व त्यामुळें खालील वाळू भयंकर तापते. तशांतच मधून मधून येथें मोठीं वादळें होतात, व या वादळांत वाऱ्यानें बारीक वाळू जोरानें चोहोंकडे हवेंत फेंकली जाते. अशा परिस्थितींत एकच वाहन टिकाव धरतें, व तें म्हणजे "उंट" हें होय. अरबस्तानां-तील हें वाळवंट इतकें अवाढव्य आहे कीं, जणूं कांहीं तें एक भला मोठा समुद्रच आहे! अवाढव्य समुद्रांतून प्रवास करावयाचा म्हटल्यास जहाजाशिवाय जसें दुसरें साधन नाहीं, तसेंच या वाळूच्या समुद्रांतून जाण्यायेण्यालाही उंटाशिवाय दुसरें साधन नाहीं, आणि म्हणूनच उंटाला 'वाळवंटांतील जहाज' असें म्हणतात.

मुलांनों, वाळवंटांतून प्रवास करतांना उंटासारखा सर्व दृष्टींनीं सोइस्कर असा दुसरा प्राणी सांपडणें शक्य नाहीं. त्याचे ते बारीक डोळे, विलक्षण नाकपुड्या, जाड व टणक जीभ, लांब मान, पाठीवर बैलाच्या वशिंडाप्रमाणें त्याची ती मोठी थोरली मदार, गुडघे व छाती यांवरील जाड व चिवट कांतडें, उंच उंच पाय, व विशेषतः त्याचीं रुंद व सपाट पावलें, हीं सर्व जणूं कांहीं अरबस्तानांतील प्रवासाकरितांच देवानें निर्माण केलीं आहेत. डोळे बारीक असल्यामुळें व पापण्यांचा त्यांना पडद्याप्रमाणें उप-योग होत असल्यामुळें वाऱ्याबरोबर उडणाऱ्या रेतीचा त्याच्या डोळ्यांना फारसा त्रास होत नाहीं; नाकपुड्यांच्या विशेष रचने-



वाळवंटांतील जहाज

मुळें वाळूच्या वादळांतही त्याला श्वासोच्छ्वास करण्यास कांहीं अडचण पडत नाहीं; जीभ जाड व टणक असल्यामुळें वाळवंटांत उगवणारीं कांटेरीं झाडें-झुडपें त्याला खातां येतात; मान लांब असल्यामुळें ओॲसेस्सारख्या ठिकाणीं ताडमाडांसारखीं साधारण उंचीवर असलेलीं झाडें तो सहज तोडूं शकतो; पाठीवरील मदारींत व ढबुरक्या पोटांत त्याला बरेंचसें अन्न व पाणी सांठवून ठेवतां येतें; गुडघे व मानेखालचा भाग यांवर असलेलें टणक कांतडें त्याला गुडघ्यांवर मान टेकून निजतांना फारच उपयोगी पडतें; उंच, उंच पायांनीं त्याला अतिशय झपाट्यानें चालतां येतें; व त्याचीं रुंद सपाट पावलें वाळूंत रुतून बसत नाहींत; काय ही ईश्वराची योजना !

अरब लोकांना उंटाचा उपयोग इतर तऱ्हेनेंही पुष्कळ होतो. त्याच्या कांतड्याचे तंबू करितात. याच कांतड्याच्या मोठाल्या पखाली करून ते लोक त्यांत पाणी भरून ठेवितात. प्रवासांत जवळचें अन्नपाणी संपून उपासमार होण्याची पाळी आलीच, तर उंटाला मारून त्याचे मदारींत असलेल्या अन्नपाण्यावर गुजराण करून अरब लोकांना आपला जीव वांचवितां येतो. अरबी मुलें व मोठीं माणसें यांना उंटाचें दूध फार आवडतें. त्याचें मांस व केस यांचाही त्यांना फार उपयोग होतो.

मुलांनों, उंट जितका उपयोगी प्राणी आहे, तितकाच तो हेकट, खट्याळ व आपमतलबी आहे. तो दिसायला मठ्ठ व गरीब दिसला, तरी कोणी अनोळखी मनुष्य जवळ गेल्यास तो त्याला चावायला पाहतो. तो नेहमीं रागानें धुसफुसत असतो. नवशिक्या मनुष्याला उंटानें पाठीवरून ढकलून खालीं पाडलें नाहीं, असें सहसा होत नाहीं. एकदां मनांत आलें कीं, मालकानें जंग जंग पछाडलें, तरी तो जागचा हलावयाचा नाहीं. एकदां असें झालें कीं, आपल्या मालकानें आपल्या पाठीवर खूप सामान लादलें आहे, अशी खोटीच समजूत करून घेऊन, कांहीं झालें तरी उठावयाचें नाहीं, असें एका उंटानें ठरविलें; त्याचा हा अडेलतट्टूपणा पाहून, त्याच्या धूर्त मालकानेंही सामान कमी केल्याचा नुसता बाहणा केल्याबरोबर तो मूर्ख उंट " मालकाला कसें वठणीवर आणलें " असें स्वतः-लाच फसवून घेऊन, पुढें चालूं लागला. उंटाचा आपमतलबीपणा तर इतका प्रसिद्ध आहे कीं, इंग्रज लोक दुसऱ्याला स्वार्थी म्हणावयाचें झाल्यास बहुधा उंटाचीच उपमा देतात, " भटाला दिली ओसरी आणि भट हात पाय पसरी " अशा प्रकारचीच एक गोष्ट उंटासंबंधानें सांगतात. एकदां एका उंटाला त्याचे मालकानें तंबू-

बाहेर बांधून ठेवून तो आंत निजला. रात्रीं कडक थंडी पडली, तेव्हां उंटानें प्रथम आपलें नाक तंबूंत शिरकावलें; व हलके हलके मानही सरकाविली; मालक दयाळू असल्यामुळें त्यानें या गोष्टीला आडकाठी केली नाहीं; परंतु उंटानें मात्र पुढचे पाय आंत गेलेले पाहून मागच्या पायांवरच उभें राहण्याचा प्रयत्न केला; त्याबरोबर तंबूची कनातच वर होऊं लागली ! तेव्हां मालकानें दयाळूपणानें त्याला मागचे पायही आंत आणण्याची परवानगी दिली; परंतु तेवढ्यानेंही उंटाचें समाधान न होतां, त्यानें मालकाच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन तंबूंतील सर्वच जागा व्यापून टाकिली, व बिचाऱ्या मालकाचीच तेथून हकालपट्टी केली !

मुलांनों, मीं तुम्हाला या ‘ वाळवंटातील जहाजा ’बद्दल बरीच माहिती सांगितली; एकंदरींत उंटाच्या स्वभावांत कांहीं खोडकरपणा असला, तरी अरब लोकांना त्याचा फार उपयोग होतो, यांत शंका नाहीं. जगांतील महत्त्वाच्या दळणवळणाच्या साधनांपैकीं “ उंट ” हें एक साधन आहे, आणि म्हणूनच अरब लोकांना त्याचें इतकें महत्त्व वाटतें. याशिवाय आरबी घोडे, किंवा अरब लोकांचे तंबू, किंवा त्यांचे प्रवासांतील मुक्काम, किंवा त्यांच्या खाण्यांतील एक महत्त्वाचा पदार्थ खजूर, तेथील शिंदीचीं फळें व अरब लोकांची एकंदर राहणी, यांसंबंधीं कितीतरी मनोरंजक माहिती तुम्हांला सांगण्यासारखी आहे; परंतु ती तुम्ही तुमच्या शिक्षकांना विचारा.

मौज ३ री

अतिशय मोठीं थडगीं.


मुलांनों, हिंदु लोकांत मनुष्य मेला, कीं त्याचें प्रेत जाळण्याची रीति आहे; क्रिस्ती व मुसलमान लोकांत प्रेतें पुरण्याची चाल आहे. प्रेत जमिनींत पुरल्यावर तें अमक्याचें आहे, व तें अमक्या ठिकाणींच पुरलें आहे, हें दाखविण्याकरितां त्यावर थडगें बांधतात. मनुष्य जितका मोठा व प्रासिद्ध, तितकें त्याचें थडगें मोठें बांधावयाचें, अशी मुसलमानांची पद्धति आहे. अर्थात् राजेरजवाड्यांचीं थडगीं सर्वांत मोठीं असणार हें उघडच आहे. आपल्या देशांत मुसलमान राजांनीं ज्या कांहीं मोठमोठ्या इमारती बांधून ठेविल्या आहेत, त्यांपैकीं कितीतरी विशेषत: थडगींच आहेत ! ताजमहाल हें एक असेंच मोठें थडगें असून, त्याच्यासारखी सुंदर इमारत पृथ्वीवर दुसरी नाहीं, असें म्हणतात.

हिंदुस्थानांतील ताजमहाल सर्वांत सुंदर असेल; परंतु जगांत जर मोठीं थडगीं पहावयाचीं असतील, तर "ईजिप्त" मध्येंच गेलें पाहिजे. हा देश आपल्या देशाच्या पश्चिमेस बऱ्याच अंतरावर आहे. उंटाची गोष्ट वाचीत असतां तुम्हांला अरबस्तानाविषयीं थोडीशी माहिती झाली आहे; त्या अरबस्तानच्या जवळच पश्चिमेला हा देश आहे. मात्र अरबस्तान आशियाखंडांत येतें, तर ईजिप्त हा देश आफ्रिकाखंडाचा भाग समजला जातो. ताजमहाल बांधून फार तर पावणेतीनशें वर्षें झालीं असतील; परंतु हीं थडगीं बांधून

५-६ हजार वर्षें झालीं असावींत, असें म्हणतात. ईजिप्तमध्येंही अरबस्तानांतल्याप्रमाणें बहुतेक ठिकाणीं वाळूच आहे; परंतु मध्यंतरीं कांहीं मोठमोठे खडक आहेत; अशा खडकांतच हीं थडगीं बांधलीं आहेत. हीं थडगीं मनोऱ्याच्या आकाराचीं म्हणजे खालीं रुंद व वर निमुळतीं होत गेलेलीं अशीं आहेत. तीन सारख्या लांबीच्या काठ्या घेऊन त्या एका टोंकाला बांधून त्यांचीं दुसरीं टोंकें फांकटून त्या उभ्या केल्या असतां जी आकृति होईल, तशा आकाराचीं हीं थडगीं आहेत. यांचा पाया तिकोनी असून प्रत्येक बाजू ७-८ शें फूट लांबीची आहे; परंतु जसजसें वर जावें, तसतशा या बाजू कमी कमी होत जाऊन अगदीं शेवटीं एक निमुळतें टोंक होतें; व अशा रीतीनें त्यांची मध्यबिंदूपासूनची सरळ उंची सुमारें ५०० फूट म्हणजे जवळ जवळ १०० पुरुष होते. मुलांनों, तुम्ही मुंबई-सारख्या ठिकाणीं जास्तींत जास्त उंच इमारत ७।८ मजली, म्हणजे फारतर १०० फूट उंचीची पाहिली असेल. अशा ५-६ इमारती जेव्हां एकीवर एक उभ्या कराव्या, तेव्हां कोठें त्यांची या थडग्यां-इतकी उंची व्हावयाची ! शिवाय मजा ही कीं, हीं थडगीं इतकीं उंच असून व त्यांना बांधून इतकीं वर्षें झालीं असूनही त्यांचा एव-ढासा भाग सुद्धां ढांसळला नाहीं किंवा पडला झडला नाहीं ! मोठमोठ्या एंजिनिअर लोकांनाही या गोष्टीचें फार आश्चर्य वाटतें. हल्लींही मोठमोठाल्या इमारती बांधतात, परंतु त्या लोखंडाच्या किंवा पोलादाच्या कांबींच्या साह्यानें बांधतात; परंतु हीं थडगीं नुसत्या दगडाचीं बांधलीं आहेत. यांना चोर दरवाजेही आहेत असें म्हण-तात. या थडग्यांखालीं जशीं ईजिप्तमधील राजांचीं प्रेतें पुरलीं आहेत, तसेंच त्यांचा पैसा अडका, दागदागिने वगैरे मौल्यवान् पदार्थही

त्यांखालीं पुरले आहेत. नुकतेच अशा प्रकारचे कांहीं पदार्थ तेथें सांपडल्याचें सांगतात.

ईजिप्तमध्यें अशा प्रकारच्या मनोऱ्यांशिवाय आणखीही एक प्रकारचा एक मोठा दगडी पुतळा आहे. या पुतळ्याचा चेहरा मनुष्याच्या चेहऱ्यासारखा असून, धडाचा भाग मात्र सिंहासारखा आहे. प्रल्हादाचें रक्षण करणाऱ्या आपल्या नरसिंहाचें तोंड सिंहासारखें, व बाकीचा भाग मनुष्यासारखा असल्याचें पुराणांत सांगतात. या पुतळ्याचें नरसिंहाच्या अगदीं उलट आहे या पुतळ्याचें तोंड अगदीं



ईजिप्तमधील दगडी पुतळा

मनुष्याच्या तोंडासारखें असून, जणूंकांहीं तो हंसतच आहे असें वाटतें. हा पुतळा एकेकाळीं वाळूच्या ढिगांत पार गडप होऊन गेला होता; परंतु असें सांगतात कीं, एका राजाला रात्रीं स्वप्नांत ही गोष्ट कळली, व त्यानें ती भोंवतालची वाळू उकरून काढून हा पुतळा मोकळा केला !

मुलांनो, ईजिप्तमध्यें या थडग्यांशिवाय व पुतळ्याशिवाय तेथील नाईल नदी किंवा कायरो शहर, किंवा त्याचे पश्चिमेस हजारों मैल पसरलेलें सहारा वाळवंट, इत्यादिसंबंधीं कितीतरी मनोरंजक माहिती तुम्हांला सांगण्यासारखी आहे. नाईल नदी तर ईजिप्तचा जीव कीं प्राण आहे. जगांतील अतीशय लांब नद्यांत हिचा नंबर दुसरा–तिसरा लागतो. ती आपल्या गंगेच्या जवळ जवळ दुप्पट असून तिचे मोठमोठे धबधबे आहेत. आपल्या बंगालला जशी गंगा, तशी ईजिप्तला नाईल आहे. ती तेथून वाहत गेली नसती, तर ईजिप्तचा हल्लींचा सुपीकपणा नाहींसा होऊन तो देश शेजारच्या सहारा वाळवंटाप्रमाणेंच रखरखीत व ओसाड झाला असता. नद्यांच्या पुरांमुळें भोंवतालच्या प्रांतांचें नुकसान होतें; परंतु ईजिप्तचें उलटें आहे; कारण नाईलच्या पुराबरोबर वाहत येणाऱ्या पाण्यावर व मातीवरच तो पोसला जात आहे; व म्हणूनच बंगाली लोक गंगेचे जितके ऋणी असतात, तितकेच ईजिप्तमधील लोकही नाईलचे ऋणी असतात. मात्र हिंदी लोकांचें आईवर फार प्रेम असतें, म्हणून ते गंगेला "गंगामाता" असें म्हणतात; तर उलट ईजिप्तमधील लोक 'नाईल' ला 'फादर नाईल' म्हणजे पिता नाईल असें म्हणतात!

कायरो हें शहर नाईलच्या मुखापाशींच असून तें आफ्रिका खंडांतील सर्वांत मोठें शहर होय. जगांतील निरनिराळ्या जातींचे लोक, निरनिराळ्या प्रकारच्या इमारती, चित्रविचित्र पेहेराव, वगैरे एके ठिकाणींच पहावयाचे असल्यास कायरोला जावें; जणूं कांहीं तेथें या सगळ्यांचें एक प्रदर्शनच मांडलें आहे! सहारा हें तर जगांतील अतिशय मोठें वाळवंट होय. तें जवळजवळ हिंदुस्थानच्या दुप्पट भरेल. त्याचा बहुतेक सर्व भाग समुद्रापासून दूर असल्यामुळें तेथें दिवसास भयंकर ऊन, तर रात्रीं कडक थंडी


पडते. हवेच्या या दुहेरी परिणामामुळें तेथील खडक खिळखिळे होऊन त्यांचा शेवटीं भुगा होतो; व हाच क्रम आज लाखों वर्षें सतत चालू असल्यामुळें, आपल्याला ही एवढी रेती एके ठिकाणीं सांठलेली दृष्टीस पडते. कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं, सहारा येथें पूर्वीं समुद्र होता; परंतु कालांतरानें त्याचा तळ वर येऊन, पाणी वाहून गेलें व अशा रीतीनें वाळवंट बनलें ! कोणीं सांगावें? हेंही म्हणणें खरें असेल ! पृथ्वीवर ज्या आश्चर्यकारक घडा-मोडी झाल्या आहेत, त्यांतील हीहि एक असेल ! मला लहानपणीं पुष्कळ दिवस ही एवढी रेती येथें कोणीं, कां व कशी आणली असावी, याचें मोठें कोडें पडलें होतें; तुमचेंही तसेंच झालें असतें नाहीं का?

मौज ४ थी

जळ-माणूस.

मुलांनों, तुम्ही एखादे वेळीं तरी सर्कस पहावयास गेलां असाल. ती पाहात असतांना, हत्ती, वाघ, सिंह, कुत्रीं, माकडें, घोडे, वगैरे प्राण्यांचीं कामें पाहून तुम्हांला फार गंमत वाटली असेल. त्यांतल्यात्यांत तुम्हांला खरी गंमत कोणाची वाटली ? तुम्हांला विशेष हंसूं कोणाचें आलें ? सर्कशींतील विदूषकाचें ना ? त्याची ती उंच टोपी व चमत्कारिक पोषाख, त्याच्या त्या कोट्या, त्याची होणारी फजिती वगैरे गोष्टींची आपणा सर्वांनाच भारी मौज वाटते. परंतु या सर्वांपेक्षांही आपणांस त्याच्या त्या ठेंगूपणाचें अधिक आश्चर्य वाटतें. भोंवतालचीं सर्व माणसें उंच, व हा मधेंच एक बुटबैंगण प्राणी पाहून आपल्याला फार हंसूं येतें.

अशा प्रकारचीं ठेंगू माणसें आपल्याकडे जरी फारशीं दिसत नसलीं, तरी आफ्रिका खंडांत ईजिप्तच्या दक्षिणेस कांगो नदीच्या कांठीं जीं दाट अरण्यें आहेत, त्यांत त्यांची फारच मोठी वस्ती आहे. त्यांना सामान्यतः "**पिग्मी**" म्हणतात. आपण मात्र त्यांना जळ–माणसें म्हणतों. तीं इतकीं ठेंगणीं व खुजीं असतात कीं, त्यांच्यातील उंच माणसें देखील जवळ जवळ आपल्या छातीला लागतील. तीं इतकीं ठेंगणीं असण्याचें कारण काय असेल बरें ? मोठ्या झाडाच्या सावटींत उगवलेलें लहान झाड उंच वाढत नाहीं; तें उंच वाढावें अशी इच्छा असल्यास आपल्याला ती सावट दूर करून त्याला भरपूर ऊन मिळेल अशी व्यवस्था करावी लागते



जळ माणूस (पिग्मी)

जी गोष्ट झाडाची, तीच गोष्ट मनुष्याची. त्याच्याही वाढीला पुरेसें ऊन मिळणें जरूरीचें आहे. परंतु हीं जळ-माणसें ज्या जंगलांत राहतात, तेथील झाडी इतकी दाट असते कीं, सूर्यकिरणांचा शिरकाव तेथें सहसा होत नाहीं. उलट झाडांची वाढ इतकी झपाट्याची असते कीं, आज झाडें पाडून केलेल्या पायवाटा थोड्याच दिवसांत पूर्वीप्रमाणें झाडें वाढून नाहींशा होतात. अशा किर्रर झाडींत या जळ-माणसांशिवाय फारसें कोणी राहणें शक्यच नाहीं. तीं जळमाणसें झाडें तोडून थोडीशी जागा साफसूफ करतात; व कांहीं काटक्या-कुटक्या उभ्या करून व त्यावर केळीच्या पानांचें छप्पर

पसरून, सात आठ माणसांना पुरेल असें एक लहानसें खोपट तयार करतात. त्यांना शेतीभाती करून धान्य उत्पन्न करण्याचें माहीत नसल्यामुळें ते आपली गुजराण हत्ती वगैरे प्राण्यांचे मांसावर व माशांवर करितात. अर्थात् पाणी पिण्याकरितां एखादा पोकळ भोपळा, मांस शिजविण्याकरितां एखादें गाडगें, शिकारीला लागणारीं धनुष्य-बाण, कुऱ्हाडी, सुऱ्या वगैरे शस्त्रें, व मासे धरण्याचें जाळें इतक्या वस्तूंशिवाय त्यांच्या संसारांत दुसरें कांहीं मिळावयाचें नाहीं. शिकार करण्यांत ते अतिशय कुशल असतात. बाण तर ते इतक्या नेमानें व जलद सोडतात कीं, धनुष्यापासून एक बाण सुटला केव्हां व दुसरा लागला केव्हां हें सुद्धां समजत नाहीं. फळांपैकीं त्यांना केळीं इतकीं आवडतात कीं, एक एक "पिग्मी" एकेका बैठकींत पन्नास साठ केळीं सहज खातो व पचवितो असें म्हणतात; पण हत्तीचें मांस, मासे, केळीं, वगैरे पदार्थ त्याला फार तर चार महिने मिळूं शकतात. एकदां पावसाळ्याला सुरवात होऊन जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें, म्हणजे त्याला खाण्याच्या वरील पदार्थांपैकीं कोणताच पदार्थ मिळत नाहीं; व मग मात्र त्याला घुशी, उंदीर, खेकडे, वगैरे जें कांहीं मिळेल तें खाऊन उपजीविका करावी लागते; परंतु दलदलीची जागा, उष्ण हवा व असलें भिकार खाणें, यांचा त्यांचे शरीरावर साहाजिकच वाईट परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं. कारण, हे "पिग्मी" सहसा चाळीस वर्षांपेक्षां जास्त जगल्याचें कोणाचे ऐकिवांत नाहीं, असें म्हणतात. हीं जळ-माणसें वर्णानें काळीं असून दिसायला अतिशय कुरूप व बेढब दिसतात. तीं सहसा स्नान करीत नाहींत, व त्यामुळें अर्थातच गलिच्छ असतात. कमरेच्या लंगोटीशिवाय त्यांच्या अंगांवर दुसरें वस्त्र दिसत नाहीं. हे लोक अत्यंत मागासलेले आहेत. त्यांना

शेती-भाती करण्याचें माहीत नाहीं, स्वयंपाक करण्याचें माहीत नाहीं, वस्त्रें विणण्याचें माहीत नाहीं; कांहीं नाहीं. शिकारीचें काम झाल्यावर जिवाची करमणूक करण्याचें एकच साधन त्यांना माहीत आहे; व तें म्हणजे ढोलक्याच्या तालावर फेर धरून वेडेंवांकडें नाचणें हें होय. त्यांना मागील काळाची माहिती नाहीं, किंवा पुढील काळाची कल्पना नाहीं. त्यांच्यांत देव नाहीं, धर्म नाहीं. त्यांना नात्या-गोत्याची किंवा मैत्रीचीही फारशी कल्पना नाहीं. ते लग्नें करतात, परंतु नवऱ्याला बायकोचा किंवा बायकोला नवऱ्याचा कंटाळा आला म्हणजे ते एकमेकांना सोडून जातात. प्राण्यांवर व शत्रूंवर दया करणें हें तर त्यांच्या स्वप्नींही नसतें.

मुलांनों, जगांत या जळ-माणसांशिवाय आणखी कितीतरी चमत्कारिक लोक भरले आहेत. आफ्रिका खंडांतील नीग्रो, अमेरिका खंडांतील रेड इंडियन्स, आशियांतील अरब व युरोपच्या उत्तरेस अतिशय थंड हवेंत राहणारे एस्किमो वगैरे लोक व त्यांची राहणी एकेकाळीं " पिग्मी " लोकांच्या राहणीइतकीच चमत्कारिक व मौजेची होती. परन्तु त्या सर्वांसंबंधीं माहिती सांगूं लागल्यास एक निराळें पुस्तकच होईल. सध्यां " पिग्मी " संबंधीं सांगितलेली माहिती लक्षांत ठेवा म्हणजे झालें.

मौज ५ वी

भुयारांतील आगगाडी

मुलांनों, आपण हिंडावयास गेलों असतां एकादे वेळीं एकाद्या दगडावर सहज बसतों, आणि बोलण्याच्या किंवा विचाराच्या नादांत एकादा दगड हातानें उचलतों; तेव्हां पुष्कळ वेळां त्याच्याखालीं मुंग्यांच्या रांगांच्या रांगा ओळीनें जात येत असलेल्या आपल्या दृष्टीस पडतात. या दगडाखालीं इतके जीव अशाप्रकारें जात येत असतील याची यत्किंचित् कल्पना तरी वरच्या माणसांना येते काय ? जमिनीखालून जशी मुंग्यांची रहदारी रात्रंदिवस चालू असते, तशीच माणसांची रहदारीहि कांहीं कांहीं ठिकाणीं जमिनींतून चालू असते, हें तुम्हांला खरें तरी वाटेल काय ?

आशिया खंडाला लागूनच पश्चिमेला जो मोठा जमिनीचा भाग आहे, त्याला युरोपखंड म्हणतात. या युरोपखंडांत इंग्लंड म्हणून एक देश आहे. त्यांतील मुख्य शहर लंडन हें होय. येथेंच आपले राजेसाहेब ५ वे जॉर्ज राहतात. हें शहर इतकें मोठें आहे कीं, सगळ्या जगांत त्याच्याएवढें मोठें दुसरें शहर नाहीं. मुंबईसारखीं ५-६ शहरें एके ठिकाणीं केलीं तरी सुद्धां लंडनची भरती होणार नाहीं ! तें इतकें अवाढव्य पसरलें आहे, व तेथें इतके लोक, इतका व्यापार, इतके कारखाने व इतके उद्योगधंदे आहेत कीं, शहरांतल्या शहरांत जाण्या-येण्याला सुद्धां ट्रॅम्‌गाड्या, होड्या, वगैरे साधनांचा उपयोग केल्याशिवाय गरीब माणसांचेंहि चालत नाहीं. परंतु इतकीं सर्व वाहनें, व पायीं चालणारे लोक यांची ये-जा बिनधोक होण्याला

रस्ते कितीतरी रुंद पाहिजेत ? लंडनचे रस्ते मुंबईचे मानानें कितीतरी रुंद आहेत; परंतु या रस्त्यांनींच केवळ भागत नसल्यामुळें, लंडनच्या लोकांनीं एक विलक्षण युक्ति केली आहे, व ती म्हणजे जमिनीखालून आगगाड्या नेण्याची !

अशा गाड्यांना ते ' ट्यूब ' म्हणतात. आपण त्यांना ' आगगाड्या ' असें म्हणतों; परंतु वास्तविक त्या विजेच्या जोरावर चालतात, व म्हणून खंडाळ्याच्या घाटांत बोगद्यांतून गाडी चालू असतां जसा धुरानें आपला कोंडमारा होतो, तसा या गाड्या जमिनीखालून चालतात तरी बसणारास धुराचा त्रास होत नाहीं. अशाप्रकारच्या गाड्यांचें जाळें सर्व शहरभर जमिनीखालीं पसरलें असल्यामुळें, व असल्या गाड्यांचीं स्टेशनें जमिनींत सर्व ठिकाणीं असल्यामुळें, शिवाय तिकिटेंहि थेटचीं मिळत असल्यामुळें, आपणांला वाटेल तेथें विजेच्या पाळण्यांतून जमिनीखालीं जातां येतें, व गाडी पकडतां येते. गाडींत बसल्याबरोबर जो तो उतारू एकादें वर्तमानपत्र किंवा पुस्तक उघडून वाचूं लागतो. आपल्या इकडच्याप्रमाणें तेथें कोणीहि गप्पा मारीत किंवा हंसत-खिदळत नाहीं; एवढेंच नव्हे, तर एकमेकांशीं साधारणपणें मोठ्यानेंहि बोलत नाहीं. भोंवतालीं दुसरेंहि कांहीं पाहण्यासारखें नसतेंच. प्रत्येकजण आपलें ठिकाण आलें कीं गाडींतून उतरतो, व पुनः एका पाळण्यांत बसून वरच्या जगांत येतो. जमिनीवरच्या गाड्यांतून धक्काबुक्की करीत, किंवा अवघडत बसून किंवा उभें राहून प्रवास करण्यापेक्षां हा निवांत व सुखाचा प्रवास लंडनमधील लोकांना फार आवडतो.

या जमिनीखालून जाणाऱ्या विजेच्या गाड्यांशिवाय आणखी कितीतरी मौजेच्या गोष्टी लंडनमध्यें आहेत. इंग्रजी राज्य म्हणजे सगळ्या जगांत श्रेष्ठ; आणि या राज्याचें मुख्य ठिकाण म्हणजे

लंडन्. मग काय विचारतां ? तेथील रस्ते काय, दुकानें काय, घरें काय, इमारती काय, बाजार काय, खेळण्याच्या जागा काय, सगळ्याच गोष्टी आश्चर्यकारक आहेत. शहर एवढें गजबजलेलें आहे, व रस्त्यानें जाणारे येणारे इतके धांदलींत दिसतात कीं, चालतांना जरा बावळटपणा झाला कीं जिवावरच प्रसंग ! परंतु असे धोक्याचे प्रसंग तेथें फारसे येत नाहींत; आणि याला एक मुख्य कारण म्हणजे तेथील **पोलीस**. आपल्याकडील पोलिसाला आपण फारसा



लंडन पोलीस

मान देत नाहीं; परंतु तिकडे पोलिसच्या नुसत्या हाताची लोकांना जितकी भीति वाटते तितकी, खुद्द राजाच्या तरवारीचीहि वाटत

नसेल ! पोलिसनें एकदां आडवा हात केल्यावर बिशाद काय कोणी पुढें जाईल ! गाड्यांच्या रांगांच्या रांगा जागच्याजागीं उभ्या ! त्यांचें तें धिप्पाड व उंच शरीर, उंच टोपी, भव्य व अधिकारयुक्त मुद्रा, व एकंदर रुबाब पाहिला म्हणजे पाहणाराला त्याच्याबद्दल फारच आदर वाटूं लागतो. तोहि लोकांना हरतऱ्हेची मदत करावयाला अगदीं तयार असतो. युरोपखंडांत लंडन्‌प्रमाणेंच बर्लिन्, पॅरिस, वगैरे मोठमोठीं शहरें आहेत. एथेंहि अशाच प्रकारच्या जमिनीखालून जाणाऱ्या गाड्या आहेत. या शहरांत अतिशय रहदारीमुळें जमिनीवर आगगाड्यांचे रस्ते करणें शक्य नाहीं, आणि म्हणून तेथें ते जमिनीखालून नेले आहेत. परंतु आगगाडीचा रस्ता करण्याचा आणखीहि एक मार्ग शक्य आहे. तळमजल्याची जागा पुरेनाशी झाली म्हणजे आपण खालीं तळघर तरी बांधतों, किंवा वर दुसरा मजला तरी चढवून तळमजल्यावरील अडचण नाहींशी करतों; तसेंच भुयारांतून आगगाड्यांचे मार्ग करणें हा एक उपाय, तर हवेंतून तसला मार्ग करणें हा दुसरा उपाय !

मुलांनों, मीं सुचविलेला उपाय काल्पनिक नसून, अमेरिकाखंडांत कांहीं ठिकाणीं अशा प्रकारें हवेंतील रस्त्यांवरून धांवणाऱ्या गाड्या आज आहेत. 'ट्यूब' कडे जातांना आपल्याला पाळण्यानें खालीं उतरावें लागतें, तर हवेंतील रस्त्यावरच्या आगगाडींत बसतांना आपणांस वर जावें लागेल ! आहे कीं नाहीं मजेची युक्ति !

जमिनीखालून जाण्याची ही युक्ति विलक्षण तर खरीच, पण पाण्याखालून जाण्याची युक्ति याहिपेक्षां जास्त विलक्षण नाहीं बरें ? पण तशीहि युक्ति तिकडील लोकांनीं शोधून काढली आहे. जमिनीखालून जाणाऱ्या गाड्यांप्रमाणेंच पाण्याखालून जाणाऱ्या एक प्रकारच्या बोटी निघाल्या आहेत, त्यांना "**पाणबुड्या**" बोटी

म्हणतात. १२ वर्षांपूर्वी इंग्लंड व जर्मनी या दोन देशांत जें भयंकर युद्ध झालें, त्यावेळीं या पाणबुड्या बोटींची युक्ति निघाली. अर्थात् त्यावेळीं त्यांचा शत्रूच्या बोटी बुडविण्याचे कामीं उपयोग केला; समुद्रांतून जाण्यायेण्याचें साधन म्हणून नव्हे. कारण जमिनीवरील रस्त्यांप्रमाणें समुद्रावरील रस्ते अपुरे पडणें शक्य नसल्यामुळें नेहमींच्या येण्याजाण्याला या पाणबुड्यांचा उपयोग करण्याची आवश्यकता आजपर्यंत भासली नाहीं, व पुढेंही फारशी भासणार नाहीं.

मौज ६ वी

पन्नास मजली इमारत

मुलांनों, तुम्हीं तीनचार मजली इमारती पाहिल्या असतील; तुमच्यापैकीं कांहींनीं मुंबईतील पांच सहा मजली इमारतीहि पाहिल्या असतील. या उंच इमारती पाहून तुम्हांस किती आश्चर्य वाटलें असेल? त्या इमारती पाहून, त्या कशा बांधल्या असतील, त्यांना किती खर्च आला असेल, त्या ढांसळून पडत कशा नाहींत, वगैरे कितीतरी विचार तुमच्या मनांत आले असतील. पांच सहा मजली इमारती पाहून जर तुमच्या मनाची अशी स्थिति होते, तर खरो-खरच पन्नास मजली इमारत पाहून तुम्हांला काय वाटेल? प्रथमतः इतक्या मोठ्या इमारती असतील हेंच मुळीं तुम्हांला खरें वाटा-वयाचें नाहीं. परंतु खरोखरीच पन्नास मजली इमारती या जगांत आहेत!

अमेरिका खंडांत युनायटेड स्टेट्स नांवाचा एक फार मोठा श्रीमंत देश आहे. तेथें 'न्यूयॉर्क' म्हणून जें एक मोठें शहर आहे, त्या शहरांत वीस-पंचवीस मजली इमारती तर कितीतरी आहेत; पण मी म्हणतों अशा पन्नास मजली इमारतीहि दोन-चार आहेत. एक मजला निदान १४।१५ फूट तरी उंच असतो; अशा हिशे-बानें या एवढ्या इमारतींची उंची किती असेल, हें तुम्हांला सहज काढतां येईल. अशा इमारतींचा पाया किती खोल खणला पाहिजे! तो १००-१०० फूट खालीं खोल खणावा लागतो! तुळया, खांब, लगा, वगैरेकरितां लोखंडी गर्डर्स व पोलादी कांबी

यांचाच उपयोग करावा लागतो. असलें घर उभारावयाचें म्हणजे एक मोठा थोरला पोलादी पिंजरा किंवा सांगाडाच उभा करण्यासारखें आहे. स्क्रू, बोल्ट्, रिव्हेट वगैरेंनें निरनिराळे भाग जोडण्याचें काम चालू असतां घणांचा व हातोड्यांचा केवढा प्रचंड खणखणाट होत असेल! ह्या एवढाल्या इमारतींतून कितीतरी कारखाने, कितीतरी दुकानें, कितीतरी कचेऱ्या, कितीतरी बिऱ्हाडें, व अर्थात् कितीतरी माणसें असतात! अशा प्रकारच्या एका इमारतींत ४००० कचेऱ्या व १०,००० लोक आहेत, असें म्हणतात! एक इमारत म्हणजे एक शहरच झालें म्हणावयाचें! अर्थात् ज्याप्रमाणें शहरांतील म्युनिसिपॅलिटीला तेथील रहिवाश्यांच्या सर्व सुखसोयी पहाव्या लागतात, त्याचप्रमाणें या इमारतीच्या मालकाला दिवा-बत्ती, पाणी, वाफ, वरखालीं जाण्यायेण्याकरितां विजेचे पाळणे, दुकानें, पोस्ट व तार-ऑफिसें, शिंपी, न्हावी, धोबी, इत्यादिकांचीं दुकानें, हॉटेलें, दवाखाने, वाचनालयें वगैरे सर्व प्रकारच्या सोयी आपल्या बिऱ्हाडकरूंकरतां कराव्या लागतात. अशा इमारतीचा तळमजला म्हणजे एकप्रकारचा कारखानाच होय. कितीतरी एंजिनें, पंप, डायनॅमो, तेथें रात्रंदिवस चालू असतात.

मुलांनों, या सर्व सुखसोयी करण्याकरितां किती पैसा लागत असेल! परंतु युनायटेड स्टेट्स हा देश फार सुपीक आहे; तेथील लोकही फार बुद्धिमान् आहेत; त्यांनीं आजपर्यंत अनेक यांत्रिक शोध लाविले आहेत व हीं यंत्रें विकून ते दरसाल अब्जावधि रुपये इतर देशांतून आणतात; व अशा रीतीनें स्वतः गब्बर बनतात.

'हेन्री फोर्ड्' म्हणून जे गृहस्थ आहेत, त्यांचा एक मोटारींचा जंगी कारखाना असून जगांतील बऱ्याचशा मोटारी त्यांच्या एक-

त्यांच्या कारखान्यांत तयार झालेल्या आहेत; 'एडिसन्' म्हणून दुसरे एक गृहस्थ आहेत. त्यांनींच तारायंत्र, विजेचे दिवे, सिनेमेटोग्राफ, ग्रामोफोन, वगैरे यंत्रें शोधून काढलीं आहेत. जशीं तेथील माणसें हुशार व बुद्धिमान् आहेत, तशीच तेथें जमीनही सुपीक आणि मुबलक आहे. गहूं, इमारतीचीं लांकडें, रॉकॉइल हीं तेथें इतकीं होतात कीं, इतर देशांत हे पदार्थ विकून युनायटेड स्टेट्स्ला पुष्कळ पैसा मिळतो. अशा रीतीनें युनायटेड स्टेट्स्मधील लोक इतके श्रीमंत झाले आहेत कीं, जगांत त्यांच्याइतके श्रीमंत दुसरे कोणतेही लोक नाहींत.

लोक श्रीमंत असतील, पण त्यांनीं इतकीं उंच घरेंच बांधलीं पाहिजेत असें काय म्हणून? अमेरिकन लोक एवढालीं उंच घरें बांधण्याचा एवढा खटाटोप कशाकरतां करितात बरें? याचें उत्तर असें आहे कीं, न्यूयॉर्क शहराची वस्ती एकसारखी वाढत आहे. नवीन घरें बांधण्यास जागा नाहीं. याजकरितां असलेल्या जागेंतच मजल्यावर मजले चढविण्याचें काम न्यूयॉर्क एथील लोकांनीं एकसारखें चालविलें आहे. मुंबईस किंवा दुसऱ्या मोठमोठ्या शहरीं घरें उंच उंच बांधतात याचें तरी कारण हेंच असतें.

अमेरिकेंतील एका मोठ्या राहत्या इमारतीबद्दल हें झालें. टॉवर किंवा मनोरा म्हटला कीं, तो साध्या इमारतीपेक्षांही उंच असावयाचा. तुम्हांपैकीं कांहींनीं मुंबईचा 'राजाबाई टॉवर' पाहिला असेल. किती तरी उंच आहे तो! सबंध मुंबईचा देखावा त्यावरून दिसतो.

न्यूयॉर्कमध्येंही "लार्विज्" नांवाचा एक मनोरा बांधला असून, त्याच्या इतका उंच मनोरा न्यूयॉर्कमध्यें व अर्थातच सर्व जगामध्यें अद्यापि दुसरा नाहीं. त्याला ११० मजले असून,

ह्याची रस्त्यापासूनची उंची १२०८ फूट म्हणजे जवळ जवळ २०० पुरुष आहे. वर जाण्याकरितां अर्थातच त्याला विजेचे पाळणे आहेत. प्रत्येक मजल्याशीं थांबणारे कांहीं साधे पाळणे व प्रत्येक विसाव्या मजल्याशींच थांबणारे कांहीं जलद जाणारे पाळणे, व खालून वर एकदम जाण्याकरतां एक अतिशय जलद जाणारा पाळणा असे तीन प्रकारचे पाळणे त्याला केले असून, या शेवटच्या पाळण्यालाहि सबंध उंची चढून जाण्याला तीन मिनिटें लागतात !

मौज ७ वी

तेलाच्या विहिरी

मुलांनो, तुम्हांला तुमच्या आजीनें एका लग्नासंबंधीं गोष्ट सांगितली असेल. मुलीकडील माणसांना कांहींतरी कारणावरून नडवावें, म्हणून मुलाकडील माणसांनीं त्यांना सांगितलें कीं, “ आमच्या परसांतील एवढी विहीर तुपानें भरून द्या, म्हणजे आम्ही लग्नाला येतों. ” मनुष्याला तुपानें विहिरी भरून देतां येणें शक्य नसेल; परंतु सृष्टीनें तेलाच्या विहिरी मात्र पुष्कळ ठिकाणीं आज हजारों वर्षें भरून ठेवल्या आहेत. आपण जें दिव्यांत भरतों, किंवा गिरण्यांत अथवा कारखान्यांत जीं ऑईल एंजिनें असतात तीं चालविण्याकरतां ज्याचा आपण उपयोग करतों, तें रॉकेल किंवा मोटारींत घालतों तें पेट्रोल काय असतें, तें कोठें होतें, वगैरे कितीतरी प्रश्न तुमच्या डोक्यांत येत असतील नाहीं ? खोबऱ्याचें तेल, सरकीचें तेल, तिळाचें तेल, भुईमुगाचें तेल, करडी, अंबाडी, मोहरी, एरंड्या इत्यादिकांचीं तेलें त्या त्या पदार्थांपासून गाळतात. त्यांचे घाणे किंवा गिरण्या असतात. या तेलांचा आपण भाजीपाल्यांना फोडणी देण्याकरितां, व कांहींचा औषधाकरतां उपयोग करतों; याशिवाय जवस, टरपिन्टाईन, सूर्य कमळांच्या बियांचें तेल, इत्यादिकांचें आपण व्हार्निश बनवितों; किंवा त्यांचा रंगांत उपयोग करतों. वरील सर्व प्रकारचीं तेलें वनस्पतींचीं असून, तीं मुद्दाम काढावीं लागतात. रॉकॉइल किंवा पेट्रोल मात्र वनस्पतींचें नसून, जमिनींत खोल असलेल्या रेतीच्या खडकांत सांपडतें;

व तें खडक खणून बाहेर काढावें लागतें; म्हणून त्यास ‘ रॉक ऑईल ’ म्हणजे ‘ खडकांतील तेल ’ असें आपण म्हणतों.

कोणी याच अर्थानें ‘ मातीचें तेल ’ असेंहि म्हणतात; या तेलाचे विहिरींतल्या झऱ्याप्रमाणें झरे असतात. जमिनींतील खडक बनण्याची क्रिया चालू असतां लाखों वर्षांपूर्वी जे प्राणी किंवा जीं झाडेंझुडपें कुजून, भाजून जमिनीशीं एकजीव झालीं, त्यांचेपासून हें तेल तयार होतें असें म्हणतात. विहिरी खणून त्यांतून रहाटानें किंवा मोटेनें पाणी काढण्याच्या पद्धतीशिवाय, आणखीहि एक पद्धति आहे; ती तुम्हीं पाहिलीच असेल. ती म्हणजे जमिनींत एक खोल भोंक पाडून, त्यांत एक लोखंडाची नळी बसवावयाची, व पंपानें पाणी वर उपसावयाचें. या पद्धतींत विहिरीप्रमाणें रुंद खड्डा खणावा लागत नसून, थेट झऱ्याला नळी जाऊन भिडेल असें खोल व लहान भोंक पाडावें लागतें. अशाप्रकारचें भोंक बोअर यंत्रानें किंवा गिरमिटानें पडत असल्यामुळें, अशा विहिरींना ‘ बोअर वेल ’ असें म्हणतात. रॉकेलच्या विहिरीहि अशाच प्रकारच्या केल्या असून त्यांतून रॉकेल आपोआप बाहेर पडत असतें. पेट्रोल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं वाहून नेण्याचें काम मात्र मोठमोठ्या पंपांच्या सहाय्यानें केलें जातें. हे पंप इतके अवजड असतात कीं, ते नुसते हातानें हालवून भागत नाहीं; तर त्यांना चालविण्याकरितां एंजिनाचाच उपयोग करावा लागतो.

अशा प्रकारच्या तेलाचे झरे पाण्याच्या झऱ्यांप्रमाणेंच पृथ्वीवर सर्वच ठिकाणीं नसतात. तर कांहीं विशेष ठिकाणींच असतात. उदाहरणार्थ, आशियांतील ब्रह्मदेश, अमेरिकेंतील युनायटेड् स्टेट्स्, यूरोपांतील रशिया वगैरे देशांत असे झरे फार आहेत. आपल्याकडे विशेषतः पहिल्या दोन देशांतील तेलच जास्त येतें. प्रत्येक

मोठ्या स्टेशनावर तेलाच्या मोठमोठ्या टांक्या भरलेल्या असतात; व त्यावर " B.O.C. " अशीं मोठमोठीं अक्षरें लिहिलीं असतात. त्यांचा अर्थ ' ब्रह्मदेशांतील तेलाची कंपनी असा असतो. किंवा रॉकेलच्या कांहीं डब्यांवर U.S.A. अशीं अक्षरें लिहिलीं असतात; त्यांचा अर्थ ' अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें ' असा असतो.

विहिरींतून काढलेलें तेल फारच घाणेरडें असतें, म्हणून बाजारांत विकावयास नेण्यापूर्वीं त्यास शुद्ध करावें लागतें. तेल शुद्ध करण्याचे कारखाने निराळे असून ते विहिरीपासून बऱ्याच अंतरावर असल्यास तेथें तेल मोठमोठ्या नळांतून पंप करून नेण्यांत येतें. अमेरिकेंत तर असले नळ हजारों मैल लांबीचे आहेत ! रॉकेल तेलापासून निरनिराळे पदार्थ आपणांस मिळतात. पेट्रोल, व्हॅसलिन्, पॅराफिन्, वगैरे पदार्थ या तेलाचींच निरनिराळीं रूपें होत. पैकीं पेट्रोल हें अतिशय शुद्ध असून त्याचा मोटारी व विमानें यांत उपयोग करतात. दिव्यांत घालण्याचे कामीं विशेषतः केरोसीन वापरतात. व्हॅसलिन्‌चा यंत्रांना लावावयाला वंगणासारखा उपयोग होतो; पॅराफिन्‌च्या मेणबत्त्या होतात. मूळचें अशुद्ध तेलही एंजिनांत घालण्यास उपयोगीं पडतें.

मुलांनों, या तेलाचे आपणांस कितीतरी उपयोग होतात बरें ? प्रकाश व उष्णता देणें हे तर त्याचे उपयोग आहेतच; परंतु त्याशिवाय मोटारी, आगगाड्या, आगबोटी इ० प्रवासाचीं साधनें व सर्व प्रकारचे कारखाने हल्लीं याच तेलानें चालले आहेत. यंत्रें चालविण्याचे कामीं कोळशाचाही उपयोग होतो.

" कोळसाहि " तेलाप्रमाणें जमिनींतच सांपडतो. पण त्याचे तेलाप्रमाणें झरे नसतात; तर तो खाणींतून खणून काढावा लागतो. तोहि तेलाप्रमाणें पृथ्वीवर सर्व ठिकाणीं सांपडत नाहीं, तर कांहीं

विशिष्ट प्रदेशांतच सांपडतो. जमिनींत कोळसा कसा बनतो, यासंबंधींची गोष्ट इतकी आश्चर्यकारक आहे कीं, ती तुम्हांला एक कल्पित कादंबरीच वाटेल. हजारों–लाखों–वर्षांपूर्वीं, पृथ्वीवर मनुष्यप्राणी उत्पन्नहि झाला नव्हता, तेव्हां पृथ्वीवर फार मोठीं जंगलें होतीं. त्यांतील झाडें अतिशय दाट व उंच असून त्यांवर मधून मधून मोठमोठ्या लतांचीं व वेलांचीं दाट जाळीं पसरलेलीं असत. अशाप्रकारचीं दाट जंगलें अद्यापही आफ्रिकेंतील कांगो किंवा अमेरिकेंतील ॲमेझॉन नद्यांच्या कांठीं आहेत. मुद्दाम पाडण्याला किंवा उचलून नेण्याला मनुष्यच नसल्यामुळें, त्यांची वाढ पुरी झाल्याबरोबर तीं जमिनीवर आपोआप पडलीं, व पडल्या ठिकाणींच गाडलीं गेलीं. कालान्तरानें जंगलें असलेल्या जागेंत फरक पडून कांहीं ठिकाणीं ओसाड मैदानें उत्पन्न झालीं, तर कांहीं ठिकाणीं समुद्र उत्पन्न झाले. अशा रीतीनें मूळच्या जंगलांतील झाडें मैदानांतील वाळूखालीं किंवा समुद्रांतील रेतीखालीं गडप झालीं. आणि नंतर हजारों वर्षांनीं जमिनींतील उष्णतेनें त्यांचा कोळसा बनला.

मुलांनों, कोळशाची ही कुळकथा तुम्हांला काल्पनिक वाटेल! परंतु कोळशाचे पानांफुलांप्रमाणें निरनिराळे आकार पाहिलेत, व त्यावरील शिरा व रेषा न्याहाळून पाहिल्यात, तर ज्याला आपण 'दगडी' कोळसा म्हणतों तो कोळसासुद्धां झाडें जळूनच झाला आहे, अशी तुमची खात्री होईल. जगांत सगळ्यांत जास्त कोळसा अमेरिकेंत सांपडतो; त्याचे खालोखाल ब्रिटिश बेटांत सांपडतो व त्याचे खालोखाल फ्रान्स व जर्मनी या देशांत सांपडतो. आपल्या देशांत बंगाल, मध्यप्रांत या बाजूला कोळसा पुष्कळ आहे; परंतु तो उकरून बाहेर काढण्याचे कारखाने अद्याप फारसे नसल्यामुळें

आपल्याला कोळशाकरितां वरील देशाच्या तोंडाकडेच पहावें लागतें. हल्लीं आपलेकडे दक्षिण आफ्रिकेंतीलही कोळसा बराच येतो. मुलांनो,कारखाने चालण्याला लागणाऱ्या गोष्टींपैकीं कोळसा ही एक असल्यामुळें ज्या देशांत कोळसा जास्त तेच देश कारखान्यांच्या बाबतींत पुढें येतात. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, जपान हे देश उद्योगधंद्यांत पुढें असतात, याचें तरी कारण हेंच.

मौज ८ वी.

पावसाचें झाड.

मुलांनों, हें झाड तुमच्या पाहण्यांत किंवा ऐकण्यांत खास नसेल. आंब्याचें झाड, भाताचें झाड, कापसाचें झाड, इत्यादि झाडें तुम्हीं पाहिलीं आहेत; आंब्याच्या झाडापासून आपणांस आंबे मिळतात; भाताच्या झाडापासून तांदूळ मिळतात; कापसाच्या झाडापासून आपणांस कापूस मिळतो; पण हें पावसाचें झाड कसें काय असेल, व त्यापासून आपणांस पाऊस कसा काय मिळणार, याचें तुम्हांला आश्चर्य वाटत असेल नाहीं?

मुलांनों, अमेरिका खंडाचे दोन मोठाले भाग आहेत; उत्तरेच्या भागाला उत्तर अमेरिका म्हणतात, तर दक्षिणेकडील भागाला दक्षिण अमेरिका म्हणतात. दक्षिण अमेरिकेंत पेरू नांवाचा एक देश आहे. तेथें एक प्रकारचीं फार मोठीं झाडें आहेत. त्यांचीं पानेंही फार मोठमोठीं असून त्यांत असा कांहीं गुण आहे कीं, त्यामुळें हवेंतील वाफेचे ढग बनतात; व या ढगांचें पाणी होऊन तें पावसाच्या रूपानें खालीं पडतें. उन्हाळ्यांत या झाडांचें हें पाणी करण्याचें काम इतक्या मोठ्या प्रमाणावर व इतक्या झपाट्यानें चालतें कीं, त्यांच्या पानांतून व खोडांमधून पाण्याचा एक मोठा पाटच्या पाट एकसारखा सुरू असतो. एकेका झाडांतून अशा-प्रकारें एका दिवसांत वाहणारें सर्व पाणी जमा करून मोजलें, तर तें ९ ग्यालन म्हणजे अजमासें ४५ शेर, किंवा एक रॉकेलचा डबाभर भरेल. एक मैल क्षेत्रफळाच्या टापूंत जर कोणीं या झाडाची लागवड केली, तर तेथें ३०,००० ग्यालन पाणी मिळेल!

इतकें असूनही या झाडाची लागवड करणें फारच सोपें आहे; कारण त्याला अमुक एक प्रकारची जमीन लागते, किंवा कांहीं विशेष प्रकारची हवा लागते, अमुक एक प्रकारानेंच त्याची लागवड करावी लागते, असें कांहीं नाहीं. शिवाय त्याची वाढही झपाट्यानें होते.

मुलांनों, किती हें उपयोगी झाड आहे ! ज्या प्रवाश्यानें हीं झाडें प्रथम पेरू देशांत पाहिलीं त्याला फारच आश्चर्य वाटलें, व त्या आश्चर्याच्या भरांत तो असें म्हणतो कीं, पृथ्वीवर ज्या ठिकाणीं मुळींच पाऊस पडत नाहीं, किंवा हिंदुस्थानांतल्या प्रमाणें ज्या ठिकाणीं पाण्याचा नेहमीं दुष्काळ पडतो, त्या ठिकाणीं हीं झाडें एकदां लावून टाकलीं कीं काम झालें ! पावसाची तक्रार कायमची मिटली ! खरोखरच प्रवाश्याला वाटतें तितकें हें सोपें असेल तर काय बहार होईल ! आणि मग या झाडाचें आपणांस खरोखरच किती आश्चर्य वाटेल !

मुलांनों, पावसाचें झाड आश्चर्यकारक असलें, तरी त्याच्या उपयोगाचा आपणांस अनुभव आला नाहीं. परंतु या झाडाइतकींच आश्चर्यकारक व शिवाय आज शेंकडों वर्षें ज्यांचा उपयोग आपण करीत आहोंत, अशीं कितीतरी झाडें जगांत भरलीं आहेत. परंतु अतिशय उपयोगामुळें व नेहमींच्या परिचयामुळेंच त्यांचें आपणांस आश्चर्य वाटत नाहीं एवढेंच ! नारळाच्या झाडाचेंच पहाना. त्याचा असा एकही भाग नाहीं, कीं ज्याचा कांहींना कांहीं उपयोग नाहीं. अन्न, पाणी, वस्त्र व घर या ज्या मनुष्याच्या मुख्य गरजा त्या सर्व नारळाच्या झाडानें पूर्ण होऊं शकतात. पृथ्वीच्या मध्यभागीं ऊन व पाऊस अतिशय असतात; म्हणून तेथील समुद्रकांठच्या जमिनींत असलीं झाडें फार होतात. हिंदुस्थान सीलोन,

ब्रह्मदेश वगैरे देशांच्या किनाऱ्या-किनाऱ्यानें नारळाच्या झाडांचीं आगरेंच्या आगरें आहेत. नारळाच्या झाडाच्या जातीचींच दुसरीं ताड, खजुरी, शिंदी हीं झाडेंहि तितकींच उपयोगी आहेत. सहारा, अरबस्तान वगैरे वाळूचे प्रदेशांतील लोकांचे खाण्यांत खजूर हा महत्त्वाचा पदार्थ समजला जातो. मुलांनों, साबूदाणाहि याच जातींतील झाडापासून करितात. 'साबूदाणा' यांतील 'साबू' या अक्षरांवरून पुष्कळ मुलांना वाटतें कीं, त्याचा व साबणाचा कांहीं संबंध असावा; किंवा 'दाणा' या शब्दावरून तो मोहरीच्या दाण्यासारखा एकादा दाणा असून, मोहरीच्या दाण्याप्रमाणें साबूदाण्याच्याहि शेंगा असतील असें वाटतें; परंतु साबूदाण्याचा 'साबू' किंवा 'दाणा' यांच्याशीं कांहींहि संबंध नसून त्याचे झाडाच्या मुळाशीं जमिनींत मोठमोठे गड्डे बनतात. गड्ड्याची पूर्ण वाढ झाली म्हणजे ते काढतात, त्यांचें पीठ करतात, व तें शिजवून त्याच्या बारीक बारीक गोळ्या पाडतात; आणि या गोळ्या म्हणजेच आपण उपासाचे दिवशीं खातों तो साबूदाणा होय.

नारळाच्या झाडाप्रमाणेंच सागवान व देवदार हींहि झाडें फार उपयोगाचीं आहेत. यांचीं लांकडें अतिशय टिकाऊ असून त्यांचा उपयोग मुख्यतः इमारती, आगगाड्या, आगबोटी वगैरे बांधण्याचे कामीं करतात; शिवाय त्यांच्याच-विशेषतः देवदाराच्या-काड्याच्या पेट्या, कागद वगैरे पदार्थहि करतात. उत्तर अमेरिकेंत कॅनडा म्हणून जो देश आहे तेथें या झाडांचीं इतकीं मोठमोठीं जंगलें आहेत कीं, तीं पाडून त्यांचे ओंडके तयार करणें हा तेथील लोकांचा एक धंदाच होऊन बसला आहे. रानांत पाडलेले ओंडके लांबलांबच्या कारखान्यांत चिरण्यासाठीं आणण्याची युक्ति मोठी मौजेची आहे. ओंडके नदीच्या प्रवाहांत सोडून दिले म्हणजे

ते पाण्याच्या ओघाबरोबर आपोआप वाहात जाऊन शेवटीं कारखान्यांजवळ जाऊन पडतात. ब्रह्मदेशांतील डोंगरांत होणारीं सागाचीं लांकडें खालीं रंगूनला आणण्याची हीच तऱ्हा आहे; म्हणून तर तेथील लांकूड आपल्याकडेहि इतकें स्वस्त विकतां येतें.

मुलांनों, रबर, कोयनेल वगैरेंचींहि झाडेंच असतात. आफ्रिका व अमेरिका खंडांत, तसेंच आशिया खंडांतील मलाया द्वीपकल्प व इंडोचायना या देशांत रबराच्या झाडांचीं मोठमोठीं जंगलें आहेत. झाडाच्या बुंध्यावर एक खोल खवला किंवा टवका पाडला म्हणजे त्यांतून चीक गळूं लागतो. तो मडक्यांत जमा करून, कढवून घट्ट केला, व वाळवून दाबून ठेवला, म्हणजे आपल्याला त्याला वाटेल तो आकार देतां येतो.

मुलांनों, या झाडांशिवाय आणखी कितीतरी उपयोगी झाडें जगांत आहेत; व त्यांचा उपयोग जेव्हां प्रथमतःच लोकांना कळला असेल, तेव्हां त्यांचेंहि त्यांना पावसाच्या झाडाइतकेंच आश्चर्य वाटलें असेल. सृष्टींतील हीं निरनिराळीं झाडें व त्यांचे उपयोग पाहिले म्हणजे सृष्टीचें मोठें कौतुक वाटूं लागतें. काय काय विलक्षण गोष्टी सृष्टींत उत्पन्न झाल्या आहेत! या गोष्टी निर्माण केल्याबद्दल सृष्टीचें जितकें कौतुक वाटतें, त्याहिपेक्षां जास्त कौतुक ज्यानें त्या गोष्टी आपल्या बुद्धीनें शोधून काढल्या, त्या मनुष्यप्राण्याबद्दल वाटत नाहीं काय? आणि मग सृष्टि व मनुष्य या दोघांसहि ज्यानें निर्माण केलें, त्या ईश्वराच्या अगाध सामर्थ्याचें कौतुक तर किती वाटावयास पाहिजे!

मौज ९ वी.

बर्फाचीं घरें.

मुलांनों, आपण राहतों तीं घरें माती, विटा, दगड, यांचीं बांधलेलीं असून त्यांवर आपण कौलें किंवा पत्रे घालतों. जेथें कळक पुष्कळ होतात, तेथें गरीब लोक बांबूच्या कुडाचीं घरें बांधतात, व वर गवताचें छप्पर घालतात. जे लोक एके ठिकाणीं फारसे न राहतां एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं सारखे भटकत असतात, ते आपलीं घरें कापडाचींच बांधतात. त्या घरांनाच आपण तंबू, डेरे, राहुट्या, वगैरे म्हणतों. उलट जे रानटी लोक रानांतील पशुपक्ष्यांना मारून आपली उपजीविका करतात, ते आपलीं घरें मारलेल्या पशूंच्या कांतड्याचीं करतात. याशिवाय कांहीं जंगली व अत्यन्त रानटी लोक तर पशु-पक्ष्यांप्रमाणेंच झाडांच्या ढोलींत किंवा डोंगराच्या गुहेंत राहतात. परन्तु या सर्वांपेक्षांही एका निराळ्या प्रकारचे लोक जीं घरें बांधतात, तीं तर फारच आश्चर्यकारक आहेत. हीं घरें बर्फाचीं होत.


मुलांनों, पृथ्वीवर अगदीं उत्तरेकडे असा एक प्रदेश आहे कीं, त्या ठिकाणीं आठ आठ महिने सूर्याचें दर्शनही होत नाहीं व त्यामुळें ऊन, पाऊस, झाडें, फुलें, फळें, पक्षी, वगैरे फारसें कांहीं दिसत नाहीं. सहारा वाळवंटांत जिकडे पहावें तिकडे वाळूच दिसते; त्याचप्रमाणें या भागांतही जिकडे तिकडे बर्फच बर्फ पसरलेलें दिसतें; आणि असें असूनही सहारांतल्याप्रमाणें त्याहि ठिकाणीं कांहीं माणसें राहतातच. या माणसांना ‘एस्किमो’ म्हणतात. दगड, माती, गवत, लांकूड, कांतडीं, कापड, वगैरे जी जी सामुग्री

घरें बांधावयास लागते, त्यापैकीं एकही गोष्ट " एस्किमो "ना त्यांच्या देशांत मिळत नसल्यामुळें, थंडीच्या आठ महिन्यांत ते जेव्हां एके ठिकाणीं राहतात, तेव्हां त्यांना आपलीं घरें बर्फाचींच बांधावीं लागतात. बर्फाचे मोठमोठे चिरे एकावर एक वाटोळे रचून हीं घरें केलेलीं असतात. चिऱ्यांमधील बारीक फटीहि बर्फानेंच भरून काढलेल्या असतात. " एस्किमो " लोक अतिशयच ठेंगणे असतात. परन्तु त्यांचीं घरें तर त्यांच्याहिपेक्षां ठेंगणीं असल्यामुळें, त्यांना आपले सर्व व्यवहार बसून किंवा ओणव्यानेंच करावे लागतात. घरांना जाण्याचे रस्ते भुयारासारखे पोकळ असून, त्यांतूनहि त्यांना रांगतच जावें लागतें. घराला एखादीच खिडकी असून तींतून उजेड येण्याकरतां तावदानाऐवजीं बर्फाचाच एक पातळ थर बसविलेला असतो. अशा रीतीनें सगळ्या गोष्टी बर्फाच्याच असल्यामुळें, व एकंदर आकारही बर्फाच्या ढिगासारखा वाटोळा असल्यामुळें, नवख्या माणसाला बाहेरून हीं घरें आहेत कीं, बर्फाचे ढीगच आहेत, हें ओळखतां येत नाहीं. ते लोक घरांत ज्या रस्त्यानें शिरतात त्या रस्त्याच्या पुढील तोंडावर दाराऐवजीं कांतड्याचे जाड पडदे सोडतात. ते घरांत एक दगडी पणती सारखी जळत ठेवितात; यामुळें बाहेर वाजते तितकी थंडी या घरांत वाजत नाहीं. वर लांकडाच्या तक्तपोशीऐवजीं एक कांतड्याचें जाड छत लावलेलें असतें. त्यामुळें वरील बर्फ थोडेंसें वितळलें, तरी पाणी खालीं ठिपकत नाहीं. जमिनीवरही बसण्याकरितां जिकडे–तिकडे कांतडींच पसरलेलीं असतात. भिंतींना कांतड्याचे चाबूक, धनुष्य–बाण, भाले, बरच्या इत्यादि शस्त्रें लटकावून ठेवण्याकरतां सोयीहि केलेल्या असतात. सारांश, या बर्फाच्या घरांतून शक्य त्या सुखसोयी करून " एस्किमो " आपला संसार सुखाचा करून घेतात. असलेल्या

वस्तूंवरच भागवून, नसलेल्या वस्तूंसाठीं अडून न बसतां, संसार सुखासमाधानानें करण्याची केवढी मोठी कला मनुष्याला साधली आहे, नाहीं !

हें झालें " एस्किमो "च्या हिंवाळ्यांतील घरासंबंधीं. उन्हाळ्यासाठीं ते निराळ्याच प्रकारचीं घरें बांधतात. या घरांनाहि लांकूड, माती, दगड, गवत, वगैरे सामग्री मिळणें त्यांना शक्यच नसतें. नाहीं म्हणावयास कधींकाळीं समुद्राचे भरतीवर एकादें लांकूड वहात आलेंच, तर त्याचा खांबासारखा उपयोग करून ते आपली अडचण भागवितात. अशा प्रकारें मिळविलेलें लांकूड मधोमध उभें करून त्यावर कांतडें पसरलें म्हणजे बनलें उन्हाळ्यांतील घर ! हीं कांतडीं मात्र " एस्किमो " ला मुबलक मिळतात. कारण पृथ्वीवरच्या ज्या भागांवर त्यांची वस्ती आहे, त्याच भागांत सील्, वालरस्, वगैरे प्राणीहि देवानें उत्पन्न केले आहेत; व त्यांचीं कांतडीं त्याला घराचे कामीं चांगलीं उपयोगी पडतात. घरांशिवाय आणखी कितीतरी बाबतींत या प्राण्यांचा " एस्किमो "ना उपयोग होतो. त्यांच्या कांतड्यांचीं घरें व कपडे हीं तर होतातच; परंतु त्यांचें मांस, रक्त, चरबी, वगैरे पदार्थांवरच " एस्किमो " आपली उपजीविका करतात. घरांतील दिव्याला लागणाऱ्या तेलवातीचे कामींही या प्राण्यांच्या चरबीचा व आंतड्यांचा उपयोग होत असल्यामुळें, या प्राण्यांपासूनच " एस्किमो "ला प्रकाश व उष्णता मिळतात असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा प्रकारें अन्न, वस्त्र, घर, प्रकाश व उष्णता या ज्या जीविताच्या मुख्य गरजा त्या सर्व " एस्किमो "च्या बाबतींत हे प्राणी भागवितात ! मुलांनों, अरब लोकांनीं आपल्या उंटाचे उपकार अधिक मानावेत, का " एस्किमो "नें या प्राण्यांचे उपकार अधिक मानावेत ?

घरें व त्यांच्या आसपासचे प्राणी या दोन गोष्टींशिवाय आणखी कितीतरी मजेदार गोष्टी "एस्किमो" संबंधीं सांगतां येण्यासारख्या आहेत. त्यांचीं तीं ठेंगणीं व घामट शरीरें, त्यांचा केसाळ पोषाख, त्यांचें तें किळसवाणें खाणेंपिणें, वगैरे गोष्टींचें तर तुम्हांला हंसूंच येईल, परंतु बर्फाचीं घरें, माशांच्या हाडकांचीं




बर्फाचीं घरें

हत्यारें, सील व वालरस या प्राण्यांच्या कांतड्याच्या होड्या वगैरे गोष्टी करण्यांत व विशेषतः सदरहू प्राणी पकडून त्यांची शिकार करण्यांत, "**एस्किमो**" जी विलक्षण हुशारी दाखवितात ती पाहिली, म्हणजे तुम्हांला त्यांच्या इतर गोष्टींचें हंसू न येतां त्यांच्या कौशल्याचें कौतुकच वाटूं लागेल.

मौज १० वी.

माणसांच्या गाड्या

मुलांनों, आपलेकडे गाड्यांना बैल किंवा घोडे जुंपतात. इंग्रज लोक ज्या देशांत राहतात तेथें घोड्यांशिवाय खेंचरें व गाढवेंहि गाड्यांना जोडतात. अरबस्तानांत उंटांच्या गाड्या असतात. पृथ्वीवरील आणखी कांहीं कांहीं देशांत तर मोठमोठे कुत्रे व सांबरेंहि गाड्या ओढण्याचें काम करतात. परंतु असा एक



देश आहे कीं, तेथें बैल, घोडे, खेंचरें, गाढवें, कुत्रे, सांबरें वगैरे पशु गाड्या ओढण्याचें काम करीत नाहींत; तर तें काम मनुष्येंच करितात. या देशाचें नांव 'जपान' असें असून तो आपल्या देशाच्या ईशान्येला बऱ्याच अंतरावर चीन म्हणून मोठा देश आहे, त्याच्या पलीकडे समुद्रांत आहे. त्याच्या सभोंवतालीं समुद्र असून तेथें बोटींतून जावयाला सुमारें १५ दिवस लागतात.

मागील पानावर दिलेलें चित्र पाहा. हीच ती माणसानें ओढावयाची गाडी. तिला जपानी लोक 'रिक्षा' म्हणतात. ती लहान, टुमटुमीत, व बरीच हलकी दिसते. तिच्यांत एकच मनुष्य बसण्याची सोय केली आहे. तो ओढणारा मनुष्य पहा कसा दणकट दिसतो तो ! जर लेंचापेंचा असता तर गाडी ओढून ओढून बिचाऱ्याची छातीच फुटली असती ! ऊन लागूं नये म्हणून बसणाऱ्या इसमानें छत्री घेतली आहे; परंतु ओढणाऱ्या माणसाचे दोन्ही हात गुंतले असल्यामुळें त्याला छत्री धरतां येणें शक्य नाहीं. म्हणून त्यानें पहा एक रुंद, पसरट अशी गवताची टोपी डोक्याला घातली आहे. त्यानें पायांत घातलेले जोडेहि गवताचेच असून ते हलके व अतिशय स्वस्त-म्हणजे २-३ पैशाला मिळणारे-असतात; अर्थात् ते फार दिवस टिकत नाहींत. मुलांनों, तुम्हांला अशा प्रकारच्या गाडींत बसावयास आवडेल काय ? लगाम धरावयाला नको, घोड्याला आंवरायाला नको, घोडा बुजून गाडी कोठें खड्ड्यांत घालील कीं काय अशी धास्ती बाळगावयास नको, कांहीं नको; परंतु आपणच बसावयाचें, व आपल्या सारख्याच माणसानें, तो केवळ गरीब आहे :म्हणून, आपल्याला ओढावयाचें, हें तुम्हांला कसेंसेंच वाटेल. परंतु जपानी लोकांना त्यांत कांहीं कमीपणा

पाटत नाहीं. उलट गरीब लोकांना 'रिक्षा' ओढणें हा इतर धंद्यांपेक्षां जास्त किफायतशीर धंदा वाटतो. पूर्वीं आपलेकडेहि श्रीमंत लोक मेण्यांतून किंवा पालख्यांतून जात-येत असत; व तें मोठेपणाचें एक लक्षण समजलें जात असें. अजूनहि लग्नकार्यांत आपण पालख्यांचा उपयोग करतोंच कीं नाहीं ? पालख्यांना किंवा मेण्यांना ४।४ माणसें लागतात. जपानी " रिक्षा " ओढावयाला एकच मनुष्य पुरतो.

आपल्या देशांतही मद्रास, सिमला, माथेरान इत्यादि ठिकाणीं असल्या " रिक्षा " दृष्टीस पडतात. जपानांत माणसांनींच गाड्या ओढण्याचें एक कारण असें असावें कीं, त्या देशांत माणसें पुष्कळ, व त्या मानानें देश तर फार लहान; अशी स्थिति असल्या-मुळें जास्तींत जास्त धान्य उत्पन्न करतां यावें म्हणून शक्य तेवढ्या जमिनीची लागवड करणें अत्यंत जरूरीचें आहे. जपानांत डोंग-रांच्या उतारांवरूनही जिकडेतिकडे भातांचीं शेतें व चहाचे मळे दृष्टीस पडतात. अशा रीतीनें गुराढोरांना किंवा घोड्यांना चरतां येईल, अशी कुरणाळ जमीनच जपानांत फारशी शिल्लक नसल्यामुळें, या देशांत घोडे, बैल, गायी, वगैरे प्राणी बाळगणें फारसें फायद्याचें नसतें. शिवाय शेतींत किंवा इतर उद्योग-धंद्यांत गुंतलेल्या माणसांशिवाय कितीतरी माणसें रिकामीं असतात. अशा परिस्थितींत माणसें गाड्यांना जोडणें हें बैल, घोडे वगैरे प्राणी गाड्यांना जुंपण्यापेक्षां कितीतरी कमी खर्चाचें होत असलें पाहिजे. जपानचें ठीक आहे; पण माथेरान, सिमला वगैरे ठिकाणीं " रिक्षा " कां असाव्यात ? कदाचित् फॅशन् म्हणून असेल. कदाचित त्या गाड्या जास्त सुटसुटीत म्हणूनहि असेल.

मुलांनों, या एका चमत्कारिक चालीशिवाय जपानी लोकांच्या

इतर चालीरीती, त्यांची राहणी, त्यांचा उद्योग वगैरे कितीतरी
चांगल्या गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. ते आतां पूर्वीप्रमाणें
नुसते शेतकरीच राहिले नसून, हल्लीं हल्लीं तर ते अमेरिका व इंग्लंड
या देशांतील व्यापाऱ्यांच्या खालोखाल जगांतील मोठे व्यापारी
असें समजण्यांत येतें. हिंदुस्थानांत तर त्यांनीं आपला व्यापार
पुष्कळच वाढविला आहे. तुमचीं सर्व खेळणीं; कागद,
कापड, हस्तिदंत, लांकूड, रेशीम वगैरेंच्या फुलें, फण्या, पंखे,
वगैरेसारख्या सुंदर सुंदर वस्तु; कागद, पेन्सिली, पाट्या, वगैरे
स्टेशनरी माल; काडयांच्या पेट्या, दिव्यांच्या चिमण्या, व विशेषतः
रेशमी व सुती कापड, वगैरे पदार्थ जपानांतूनच येतात. हे सर्व
पदार्थ जपानमधूनच कां येतात हें विचार करण्यासारखें आहे. ते
मोठे बुद्धिमान् व शूर आहेत. त्यांच्या शेजारींच उत्तरेला रशिया
म्हणून एक मोठा अवाढव्य देश आहे. सुमारें २५–३० वर्षांपूर्वी
त्याची व जपानची लढाई जुंपली; व तींत जपानचे लोक अति-
शयच कमी असूनही त्यांनीं रशियन् लोकांचा पराभव केला !
त्यांना स्वतःचा देश फारच आवडतो; व देशाकरतां ते वाटेल
ते कष्ट सोसण्यास तयार असतात. जपानी मुलेंहि तशींच. तीं
तुमच्यापेक्षां ज्यास्त उद्योगी व खेळकर असतात. नेहमींच्या
खेळण्याशिवाय त्यांच्यांत ‘ पतंगांचा सण ’ व ‘ बाहुल्यांचा सण ’
असे खास मुलांकरितां दोन सण असतात. पहिल्या सणाचे
दिवशीं मुलगे पतंग वगैरे कागदाच्या वस्तु करून किंवा विकत
घेऊन त्यांनीं खेळतात; दुसऱ्या सणाचे दिवशीं मुली निरनिराळ्या
प्रकारच्या बाहुल्या करून खेळतात. याचा एक फायदा असा
होतो कीं, मुलांना हस्तव्यवसायाची गोडी लहानपणापासूनच
व खरोखरची लागते; व त्यांच्यांतूनच कांहीं पुढें उत्तम

कारागीर होतात. मुलांचे जसे खास सण असतात, त्याप्रमाणेंच मोठीं माणसेंहि झाडांफुलांना बहर आला म्हणजे एका ठरलेल्या दिवशीं एकाद्या सुंदर ठिकाणीं जमतात, व फराळ वगैरे करून तो सबंध दिवस मोठ्या मजेंत घालवितात.


मुलांनो, एकंदरींत पाहतां जपानी लोक आहेत कीं नाहींत मोठे हौशी व आनंदी ?

— —

मौज ११ वी.

एक अजस्र भिंत.

मुलांनों, पहिल्या गोष्टींत हिंदुस्थानांतील लेण्यांसंबंधीं सांगतांना मीं हिमालय पर्वतासंबंधीं थोडासा उल्लेख केला होता हें तुम्हांला आठवत असेलच. जगांतील सर्व पर्वतांपेक्षां हिमालय उंच असल्यामुळें परदेशांत राहणाऱ्या लोकांना त्याच्या उंचीचेंच कौतुक वाटतें. परंतु आपणा हिंदी माणसांना या त्याच्या उंचीचा आपल्या जीविताशीं किती निकटचा संबंध आहे हें जितकें पटतें तितकें त्यांना पटणें शक्य नाहीं. हिमालय इतका उंच आहे, व भिंतीसारखा आडवा पसरला आहे म्हणूनच पलीकडल्या रानटी व लुटारू तार्तर लोकांना इकडे म्हणजे हिंदुस्थानांत येऊन लुटालूट करतां येत नाहीं. हा हिमालय नसता तर या लोकांना थोपवून धरण्याकरतां आपल्याला किती त्रास पडला असता! चीन देशाचीच गोष्ट घ्याना. हा देश आपल्या हिंदुस्थानासारखाच किंबहुना त्याहीपेक्षां मोठा असून तो आपल्या देशाच्या ईशान्येला आहे. याहि देशांतील लोकांना या तार्तर लोकांचा फार त्रास होत असे. हिंदुस्थानचें रक्षण करण्याकरितां सृष्टीनेंच जशी हिमालयाची स्वाभाविक भिंत बांधली आहे, तशी चीनचे भोंवतालींहि तिनें बांधली नसल्यामुळें चिनी लोकांना उत्तरेच्या बाजूला एक भली मोठी खरोखरची भिंत बांधावी लागली आहे. ही भिंत जवळजवळ १५०० मैल लांब, व २०–२५ फूट—म्हणजे सहज दोन गाड्या जाऊं येऊं शकतील इतकी—जाड आहे. पुण्यापासून मुंबई



एक अजस्त्र भिंत

१२० मैल लांब आहे; या मानानें ही १५०० मैल लांबीची भिंत किती लांबवर पसरली असेल याची तुम्हांला कल्पना येईल. तिच्यावरून आगगाडीनें प्रवास करावयाचें म्हटल्यास २–२॥ दिवस लागतील. ही भिंत इसवी सनापूर्वीं २०० वर्षें म्हणजे सुमारें २१०० वर्षांपूर्वीं, चिन्–शिह्–अँग्टी नांवाच्या राजानें बांधली असें सांगतात. हा राजा इतर बाबतींत फारच वाईट व आपमतलबी होता. आपणच चीनचे अगदीं पहिले राजे, व चीन देशाची जी कांहीं सुधारणा आज दृष्टीस पडते ती सर्व आपणच केली असें पुढील पिढ्यांना वाटावें म्हणून त्या दुष्ट

राजानें आपल्या पूर्वीच्या ग्रंथांतून जें जें कांहीं चांगलें होतें तें तें सर्व नाहींसें केलें; हेतु हा कीं, त्या ग्रंथांत लिहून ठेवलेलीं शास्त्रें व कला या संबधींचा कांहींहि मागमूस पुढच्या लोकांना लागूं नये, व सर्व कांहीं आपणच निर्माण केलें असें लोकांना भासावें. परंतु त्याच्या दुर्दैवानें एक म्हातारा असा निघालाच कीं, त्याला त्या ग्रंथांत लिहून ठेवलेलें सर्व कांहीं पाठ येत होतें; व अशा रीतीनें त्या दुष्ट राजाचा दुष्ट हेतु न साधतां खरी स्थिति पुढील पिढ्यांतील लोकांना समजलीच !

ही उंच भिंत ज्या डोंगरांवर बांधली आहे ते डोंगरही उंचच असल्यामुळें एकंदर भिंत इतकी उंच दिसते कीं, मंगळाच्या ताऱ्यावरून—म्हणजे अदमासें ३ कोटी मैल अंतरावरून– पृथ्वीच्या पृष्ठभागाकडे पाहणारास मानवी हातानें बांधलेली—सृष्टीनें निर्माण केलेली नव्हे—अशी एकादी कृति दिसणें शक्य असेल तर ती ही चिनी भिंतच होय, असें म्हणतात. एवढें खास कीं, आजपर्यंत मनुष्यानें जें जें कांहीं पृथ्वीवर बांधून ठेवलें आहे त्या सर्व बांधकामांत चिनी भिंत हीच सर्वांत उंच आहे, ही गोष्ट अगदीं खरी आहे.

ही सर्व भिंत वरून मोठमोठ्या पक्क्या विटांनीं बांधून घेतली असून तिच्या पोटांत मात्र माती आहे; आणि म्हणून तिची वेळोवेळीं इतकी दुरुस्ती करावी लागली आहे कीं, आतां मूळची भिंत फारच थोड्या ठिकाणीं शिल्लक राहिली आहे. ही सर्व भिंत डोंगरांवरच बांधली असल्यामुळें डोंगर ज्या मानानें खालीं वर झाले आहेत, त्या मानानें ही भिंतही खालींवर होत गेली आहे. शत्रूची टेहळणी करण्याकरितां म्हणून हिच्यावर मधून उंच उंच बुरुजासारखे मनोरे उभारले असून, प्रत्यक्ष लढाईची पाळी आली असतां

उपयोगी पडाव्या म्हणून त्या मनोऱ्यांवरून मोठमोठ्या अवजड पितळी किंवा लोखंडी तोफा ठेवल्या आहेत. मुलांनों, पहा, ज्या वेळीं युरोप व आशिया खंडांतील इतर लोक अगदीं रानटी दशेंत होते, त्यावेळीं चिनी लोकांना बांधकाम, तोफा पाडणें व त्यांना लागणारा दारूगोळा तयार करणें इत्यादि कलांसंबंधीं पूर्ण माहिती होती ! वरील कलांशिवाय त्यांस छापण्याच्या कलेची व खलाशी लोकांच्या दिशा ओळखण्याच्या यंत्राचीही माहिती इतक्या जुन्याकाळीं होती ! चिनी लोक पूर्वी फारच बुद्धिमान व सुधारलेले असले पाहिजेत. पण वाईट येवढेंच वाटतें कीं, ते पूर्वी जितके सुधारलेले होते, तितके आतां राहिले नसून, उलट इतर राष्ट्रांच्या मानानें मागेच पडले आहेत. कारण आपल्या पूर्वीच्या ज्ञानामध्यें भर घालून त्याचा व्यवहाराकडे उपयोग करून घेण्याऐवजीं ते असलेल्या ज्ञानांतच संतुष्ट राहिले ! व इतर लोकांनीं मात्र चिनी लोकांच्या ज्ञानाचा व शोधांचा फायदा घेऊन आपली सुधारणा करून घेतली.मुलांनों, चिनी लोक या बाबतींत अगदीं आपल्यासारखे आहेत नाहीं ? आपणा हिंदी लोकांनाहि इतर लोकांचे अगोदर विमानाची कल्पना नव्हती का ? रामानें ' पुष्पक ' नांवाच्या विमानांतूनच सीतेला लंकेहून परत आणिली अशी गोष्ट तुम्हीं ऐकिली असेल. परंतु त्या माहितींत भर न घालतां उलट आपण ती कलाच इतकी विसरून गेलों कीं, विमानासंबंधींच्या सर्व गोष्टी आतां आपणांस इतर लोकांपासून शिकाव्या लागत आहेत.

तार्तर लोकांपासून चीन देशाचें रक्षण करण्याकरितां म्हणून ही भिंत बांधणें त्यावेळीं जरूरीचें असलें तरी, सामान्यतः चिनी लोकांना, हिंदु लोकांप्रमाणेंच, प्रत्येक ठिकाणीं भिंती घालण्याची संवयच लागली होती असें दिसतें. त्यांच्या बागा, अंगणें, घरें,

शहरें या सर्वांभोंवतीं जाडजूड भिंती असावयाच्याच. हेतु हा कीं, इतरांना आपल्या घरांत काय चाललें आहे हें दिसूं नये. परंतु या भिंती घालून अडोसा करण्याच्या या चालीचा त्यांच्यावर एक कायमचा वाईट परिणाम असा झाला आहे कीं, त्यांचें आपसांतील दळणवळण कमी होऊन ते कितीतरी वर्षे संकुचित दृष्टीनें व मागासलेले राहिले. हल्लीं कोठें त्यांच्यांत शिक्षणाचा व कलांचा प्रसार होऊं लागून एक प्रकारची जागृति उत्पन्न झाली आहे.

मुलांनों, तुम्हांला या भिंतीप्रमाणेंच चिनी लोकांसंबंधीं आणखी कितीतरी मजेदार गोष्टी सांगतां येतील. पुरुषांची लांबलचक शेंडीची वेणी तर प्रसिद्धच आहे. ही वेणी फार लांब असते. कधीं कधीं ती कमरेपर्यंतहि असते. आतां मात्र शिकलेले चिनी लोक ही वेणी ठेवीत नाहींत. साहेबलोकांप्रमाणेंच ते केस ठेवितात व विंचरून भांग पाडतात.

चिनी लोक आपणांप्रमाणें हातानें, किंवा साहेबलोकांप्रमाणें कांट्या-चमच्यानें जेवीत नाहींत; तर बांबूच्या दोन लांब काड्या घेऊन ते त्यांनीं भराभर जेवतात. चीनमध्यें तांदूळ व चहा यांचें पीक फार. परंतु लोक अतिशय असल्यामुळें नुसत्या भातावर सर्वांचें भागणें शक्य नाहीं. भाताशिवाय यांना मांस व मासेहि खावे लागतात. याशिवाय सरडे, पाली, झुरळें यांचाहि त्यांचीं लोणचीं, रायतीं वगैरे करून तोंडी लावण्याकडे ते उपयोग करतात ! परंतु ते तरी बिचारे काय करतील ? इतक्या लोकांना तांदूळ, मासे, भाजीपाला पुरला तर पाहिजेना ? कारण चीनदेशांत जितकीं माणसें आहेत तितकीं दुसऱ्या कोणत्याही एका देशांत नाहींत. आपणही त्यांच्याइतके असतों, व आपल्या देशांतही

जर पुरेसें धान्य पिकलें नसतें, तर आपलीहि स्थिति तीच झाली असती !

मुलांनों, तुम्हांला मजेदार वाटणारी एक गोष्ट सांगूं का ? चिनी मुलें तुमच्यासारखें पेन्सिलीनें किंवा लेखणीनें लिहीत नाहींत, तर तीं ब्रशानें लिहितात. तसेंच तीं आपल्याप्रमाणें डावीकडून उजवीकडे आडवें लिहीत जात नाहींत, तर कागदाच्या उजव्या बाजूच्या वरच्या कोंपऱ्यापासून खालीं खालीं लिहींत येतात. उदाहरणार्थ, ' मुला तुझें नांव काय ? इकडे ये; हा खाऊ घे.' असें सरळ आडवें लिहिण्याऐवजीं चिनी मुलें या अर्थाच्या त्यांच्या लिपींतील खुणा खालीलप्रमाणें लिहितील:—


इ मु आरबी किंवा फारशी लिहिण्याच्या पद्धतींतहि
क ला चिनी लोकांप्रमाणें उजवीकडून डावीकडेच
डे तु लिहीत जातात; परंतु त्यांचप्रमाणें ते उभें न
ये झें लिहितां आपलेप्रमाणें आडवें लिहितात. चीन-
हा नां मध्यें मुलींपेक्षां मुलांना जास्त मान देतात. त्याची
खा व बडेजाव फार. आपल्याकडील प्रमाणेंच मुलगी
ऊ का झाली कीं आईबापांचीं मनें खट्टू होतात. परंतु
घे. य हीहि स्थिति आतां नाहींशी होऊन, दिवसें-
दिवस सर्व देशच सुधारत चालला आहे. मुलांनों, आपल्या जुन्या दोस्ताप्रमाणें आपणांसही आतां सुधारावयास पाहिजे नाहीं ?

मौज १२ वी.

तीन पायांचा प्राणी.

मुलांनों, कुत्रीं, मांजरें, गायी, बैल, घोडे, सिंह, वगैरे पशूंना चार पाय असतात; चिमणी, कावळा, पोपट, वगैरे पक्ष्यांना व माणसांना दोन पाय असतात; कीटकांना सहा पाय असतात; परन्तु मी ज्या प्राण्याबद्दल आतां तुम्हांला सांगणार आहें त्याला पशूंप्रमाणें चार पायांचा मानावयाचा, का पक्ष्यांप्रमाणें दोन पायांचा मानावयाचा, का मी म्हणतों त्याप्रमाणें तीन पायांचाच म्हणावयाचा, हें तुमचें तुम्ही ठरवा. ह्या विचित्र प्राण्याचें नांव "**कांगारू**" असें आहे. हा प्राणी ऑस्ट्रेलिया म्हणून एक मोठें खंड हिंदुस्थानच्या आग्नेयेला बऱ्याच अंतरावर आहे, त्या देशांतला मूळचा राहणारा. तथापि तो तुम्हांला मुंबईच्या राणीच्या बागेंत किंवा अशाच इतर पशु-संग्रहालयांत पहावयास सांपडतो. तुम्ही मुंबईस गेलां तर तो अवश्य पहा! ऑस्ट्रेलियासारखी कुरणाची जमीन व बेताची कडक हवा या प्राण्याला फार चांगली मानवते. या प्राण्याच्या पुष्कळ जाती असून त्यांची उंचीही कमजास्त असते. कांहीं कांहींची उंची तर, सहा फुटांपेक्षांही जास्त असते; म्हणजे हे प्राणी उंच माणसापेक्षांही जास्त उंच दिसतात. "**कांगारू**"च्या चित्राकडे पहा. त्याचे पुढचे पाय कसे आंखुड व रोडलेले दिसत आहेत. चालण्याचे कामीं त्यांचा उपयोग होईनासा झाल्याबरोबर बिचाऱ्यांची शक्तीही नाहींशी झाली आहे! व कांहीं दिवसांनीं तर, ते अजिबातच नाहींसे होतील कीं काय कोणास ठाऊक! इंग्लंडांत बैलांना आतां कोणी नांग-

राला किंवा गाडीला जुंपीत नसल्यामुळें त्यांचें वशिंडच नाहींका नाहींसें झालें ? तशीच स्थिति " **कांगारू** "च्या पुढच्या पायांचीही झाल्यास नवल नाहीं. उलट मागचे पाय पहा केवढे लांब व जोरदार आहेत. कारण चालण्याचा सर्व भर आतां त्यांचेवरच पडत आहे. पुढचे पाय असून निरुपयोगी झाल्यामुळें व मनुष्यांप्रमाणें अजून सर्वस्वी मागील पायांवरच ताठ उभें राहतां येत नसल्यामुळें या प्राण्यांची चालतांना किंवा धांवतांना मोठी चमत्कारिक स्थिति झाली असती खरी. पण ही त्यांची अडचण ओळखूनच कीं काय, देवानें त्यांना एवढें मोठें व दणकट शेंपूट दिलें आहे कीं, मागले दोन पाय व तिसरें शेंपूट यांच्या जोरावर तो धांवूं पळूं शकतो; एवढेंच नव्हे, तर तो वीस वीस फूट लांब उड्या मारूं शकतो !



कांगारू

बैल, गाई, म्हशी वगैरे प्राण्यांना आपलें शेंपूट माशा हांकलण्यास उपयोगी पडतें. पण "कांगारू"चें शेंपूट त्याला पळण्याचे कामीं उपयोगी पडतें! दोन पाय व शेंपूट यांच्या साहाय्यानें हा प्राणी चालतो व पळतो म्हणून मीं याला तीन पायांचा प्राणी असें म्हटलें आहे. माझें म्हणणें बरोबर आहेना? "कांगारू"च्या शरीराचा दुसरा एक चमत्कारिक भाग म्हणजे मादीच्या पोटावर असलेला एक मोठा स्वाभाविक खिसा किंवा कप्पा हा होय. या कप्प्यांत मादी आपलें लहान पोर, तें धांवू पळूं लागेपर्यंत ठेवीत असते. माणसें आपल्या मुलांना कडेवर, खांद्यावर किंवा पाठीशीं बाळगतात; परंतु "कांगारू"ची मादी आपलें पोटचें पोर पोटाशींच बाळगते. चित्रांतील "कांगारू"कडे पहा. त्याच्या पोटांतून आणखी एक चिमुकलें पोर आपलें तोंड बाहेर काढून डोकावीत असल्याचें तुम्हांला दिसेल.

ऑस्ट्रेलियांतील लोक "कांगारू"ची शिकार करून त्याचें मांस खातात; किंवा त्याच्या केसाचे मऊ मऊ कपडे करतात.

मुलांनों, या "कांगारू"शिवाय आणखीहि कितीतरी चमत्कारिक प्राणी ऑस्ट्रेलियांत आहेत. "एमू" नांवाचा एक शहामृगाप्रमाणें दिसणारा प्राणी आहे. त्याला पक्षी म्हणतात, परंतु त्याला पक्ष्यांप्रमाणें पंखही नाहींत व उडतांही येत नाहीं! पण तो माणसापेक्षांहि उंच असून, घोड्यापेक्षांहि जास्त जलद धांवतो. आफ्रिका खंडांतही तेथील दाट जंगलांत कांहीं कांहीं चमत्कारिक प्राणी दृष्टीस पडतात. "जिराफ" हा प्राणी हत्ती, उंट, वगैरे उंच प्राण्यांपेक्षांहि जास्त उंच असतो. झाड कितीहि उंच असेना, याचें तोंड त्याला पोंचावयाचेंच! ऑस्ट्रेलियांतील 'एमू'प्रमाणेंच उडतां न येणारा, अत्यंत जलद धांवणारा, पण 'एमू'पेक्षांहि मोठा

असा एक पक्षी आफ्रिकेंत सांपडतो, त्याला " ऑस्ट्रिच् " किंवा शहामृग म्हणतात. मुलांनों, तुम्हांला हे व आणखीहि कितीतरी चमत्कारिक प्राणी मुंबईस राणीच्या बागेंत पहावयास सांपडतील. केव्हांना केव्हां तरी ते अवश्य पहा.

" कांगारू "शिवाय ऑस्ट्रेलियांतील आणखीहि एकदोन गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. तेथें मेंढ्यांना चरण्यासारखी जमीन मुबलक असल्यामुळें, सामान्य माणसांपाशींहि मेंढ्यांचे मोठमोठे कळप असतात. शिवाय मेंढ्यांवर लोंकरही फार दाट व चांगली येते. आपल्याकडे मेंढ्या थोड्या व त्यांवर लोकरही फारशी नसल्यामुळें धनगर लोक नुसत्या हातानेंच लोंकर कातरतात; परंतु तेथें अशाप्रकारें हातानें लोंकर कातरणें शक्यच नसतें; ती यंत्रांनींच काढावी लागते. तसेंच येथें जमिनींतून पाण्याचे मोठमोठे फवारे वर उडत असल्यामुळें, लोंकर धुण्याकरितां लागणाऱ्या वाहत्या पाण्याचीहि चांगलीच सोय आहे; परंतु एकादे वर्षी पाऊस न पडून माळांवर गवत उगवलें नाहीं, म्हणजे मेंढ्या पटापट मरतात, व सर्व माळचे माळ मेंढ्यांच्या प्रेतांनीं भरून जातात ! ऑस्ट्रेलियांतील आणखीहि एक मोठी उत्पन्नाची बाब म्हणजे **गहूं** ही होय. तेथें हजारों एकर जमिनीवर गव्हांच्या शेतांशिवाय दुसरें कांहीं दिसणार नाहीं. आपल्या हिंदुस्थानांतहि वऱ्हाड, मध्यप्रांत, पंजाब, सिंध, वगैरे प्रांतांत पुष्कळ गहूं पिकतो; परंतु तो ऑस्ट्रेलियांतील गव्हाचे मानानें फारच थोडा. मुलांनों, ऑस्ट्रेलियांतून इतकी लोंकर व गहूं हीं दुसऱ्या देशांत जातात कीं, जणूं कांहीं दुसऱ्या देशांना अन्न व वस्त्र पुरविण्याचें काम एकट्या ऑस्ट्रेलियाचेंच आहे ! याशिवाय तिसरें मोठें उत्पन्न म्हणजे तेथील डोंगरांत सांपडणारें **सोनें** हें होय. या सोन्याचा शोध

थम कसा व कोणीं लावला, तो लागल्यावर तेथील लोकांची
कशी स्थिति झाली, वगैरे गोष्टी फारच मनोरंजक आहेत; परंतु
या मी याच भागांत न सांगतां पुढच्या एखाद्या भागांत
ांगेन.

मौज १३ वी.

पृथ्वीची लूट.

मुलांनों, पूर्वी पैसे सुरक्षित ठेवण्याकरितां हल्लींप्रमाणें बँका वगैरे नव्हत्या, व चोराचिलटांचें भयहि जास्त असल्यामुळें, लोक आपला सर्व पैसाअडका, दागदागिने, वगैरे जमिनींत पुरून ठेवीत असत, व कधींमधीं सणांवारांना बाहेर काढीत असत. पृथ्वीचें वर्तनहि, मला वाटतें, या बाबतींत मनुष्याप्रमाणेंच आहे. तिनें आपली सर्व संपत्ति जमिनींत पुरून ठेविली आहे. हल्लींच्या बंदोबस्ताच्या दिवसांत माणसांमाणसांमधील चोऱ्यामाऱ्या किंवा लुटालुटी कमी झाल्या असतील; परंतु मनुष्यानें पृथ्वीची जी लूट चालविली आहे, ती कोण, कशी व केव्हां कमी करणार? पण मनुष्य पृथ्वीला लुटून लुटून तरी किती लुटणार? पृथ्वी ही इतकी मोठी आहे, व तिच्यांतील संपत्तीहि इतकी विपुल आहे, कीं मनुष्य आपल्या संपत्तीची चोरी करतो आहे याची तिला दाद देखील नाहीं! जमीन व पाणी हे जे पृथ्वीचे दोन भाग, या दोन्ही भागांत तिनें आपली संपत्ति सारखीच भरून ठेविली आहे; व या दोन्ही ठिकाणीं मनुष्याचे हल्ले सारखे चालू आहेत.

मुलांनों, पृथ्वीनें जमिनींत ही पुरलेली संपत्ति कोणती बरें असेल? सोनें, चांदी, तांबें, लोखंड, निकेल, जस्त, कथील, वगैरे धातू तर तुम्ही ओळखलेच असतील; परंतु कोळसा, माती, दगड, तेल, हीहि जमिनींत पुरलेली संपत्तीच होय. मागील एका

भागांत मीं तुम्हांला तेल व कोळसा यांची माहिती दिलीच आहे. या भागांत धातूंपैकीं अतिशय महत्त्वाचे धातु जे **सोनें** व **लोखंड** त्यांची माहिती देतों.

सोन्याचे दागदागिने करतात व नाणें पाडतात, हें तुम्हांला माहितच आहे. परंतु तें पृथ्वीवरील कोणकोणत्या देशांत सांपडतें, त्याचा प्रथमतः कोणीं, केव्हां व कसा शोध लाविला, तें जमिनींतून वर कसें काढतात, तें आपणांला जसें दिसतें तसेंच मूळपासून असतें, का त्याच्यांत कांहीं फरक पडतो, त्याचीं नाणीं कशीं पाडतात, इत्यादि कितीतरी गोष्टींविषयीं तुम्हांला ऐकावेसें वाटत असेल, नाहीं? ही सर्व माहिती थोडक्यांत देणें फार कठीण आहे; परंतु पाहतों जमतें का!

मुलांनों, आपण आपल्या हिंदुस्थानाला ‘ सुवर्णभूमि ’ म्हणजे सोन्याची जमीन असें म्हणतों तें तेथें सोनें सांपडतें म्हणून नव्हे; तर तेथें उत्पन्न होणाऱ्या सर्व प्रकारच्या व मुबलक धनधान्यामुळें; तथापि म्हैसूर, हैद्राबाद वगैरे संस्थानांत तें थोडेसें सांपडतेंहि. परंतु हिंदुस्थानांत सांपडणाऱ्या सोन्यापेक्षां कितीतरी जास्त सोनें आफ्रिका व ऑस्ट्रेलिया या खंडांत सांपडतें. येथें सोन्याच्या खाणींचा शोध कसा लागला, याची हकीगत फारच मौजेची आहे. आफ्रिका खंडाच्या पश्चिमेस गिनीचे किनाऱ्यावर "**अशांटी**" म्हणून जें ठिकाण आहे तेथील मूळचे रहिवासी तेथील सोन्यासंबंधीं फारच चमत्कारिक गोष्टी सांगतात. उदाहरणार्थ, पूर्वीं तेथील कोणी बडे लोक मेले म्हणजे त्यांस सोन्यांतच पुरीत असत! तेथें पूर्वीं सोन्याचे ४-४।५-५ फूट उंचीचे खांब असून, त्यांची राखण करण्याकरितां त्यांवर भुतें बसलीं असत; व कोणी दुष्टानें खांबांना हात लावला कीं, तीं भुतें त्याला आंधळा करून टाकीत! अर्थात् या गोष्टी काल्पनिक आहेत;

परंतु त्यांवरून तेथें पूर्वीपासूनही सोनें किती मोठ्या प्रमाणांत सांपडत आहे, याची कल्पना होते. इंग्रज लोकांनीं सोन्याचा हा टापू आपल्या कबज्यांत आणण्याचे फार दिवस प्रयत्न केले. हा भाग इतका रोगट असे कीं, त्या रोगानें त्यांचे हजारों लोक मेले. शेवटीं १८९६ सालीं हा भाग त्यांचे अंमलाखालीं आला, व तेव्हांपासून तेथील खाणींचें काम सुरळीत चाललें आहे, आपण सोन्याच्या एका नाण्याला "गिनी" म्हणतों त्याचें कारण, हें नाणें मूळ गिनीच्या किनाऱ्यावर सांपडणाऱ्या सोन्याचें पाडलें, हें होय. पश्चिम किनाऱ्याप्रमाणेंच आफ्रिकेच्या दक्षिण किनाऱ्यावरही सोनें असल्याचें १८९६ पूर्वीच समजून आलें होतें. येथें मोठमोठ्या व हजारों फूट खोल खाणी आहेत. जमिनींत खालीं खणीत जात असतां, सोन्याचे दगडच्या दगड सांपडतात. ते मोठमोठ्या जात्यांत घालून दळतात व त्या भुग्यांतून सोनें निराळें करण्यांत येतें.

आफ्रिका खंडांतल्या खाणींप्रमाणें ऑस्ट्रेलिया खंडांतील सोन्याच्या खाणी खोल नसतात. तेथें सोनें डोंगरांत, जमिनीवरील धुळींत किंवा नदीच्या रेतींत मिसळलेलें दृष्टीस पडतें. त्यामुळें आफ्रिका खंडांतील खाणींतून सोनें काढण्याला जितका खर्च येतो व मेहनत पडते, तितका खर्च व मेहनत हें सोनें काढण्याला लागत नाहीं. वाळू धुऊन तें पाणी कांहीं वेळ तसेंच ठेवून दिलें म्हणजे जड सोनें आपोआपच खालीं तळाशीं बसतें.

या बाजूच्या सोन्याचा शोध लावण्याचें श्रेय 'हारग्रेव्ह' नांवाच्या मनुष्यास आहे. हा मूळ शेतकरी असून ऑस्ट्रेलियाच्या आग्नेय किनाऱ्यावर 'बॅथर्स्ट' म्हणून एक गांव आहे तेथें रहात असे. परंतु फार दिवस पाऊस न पडल्यामुळें बिचारा शेतीला कंटाळला; व निराश होऊन, अमेरिका खंडांतील एका गांवीं

नुकतेंच सोनें सांपडलें होतें तेथें सोनें मिळवून श्रीमंत होण्या-करितां गेला. इतर लोक चांगले गब्बर होत होते, परंतु हा बिचारा मात्र गरीबच्या गरीब राहिला. परंतु डोंगर फोडीत असतां त्याच्या मनांत सहज असा एक विचार आला कीं, जर ' बॅथर्स्ट 'चे डोंगर-ही याच डोंगराप्रमाणें दिसतात, तर येथल्याप्रमाणें तेथेंहि सोनें कां सांपडूं नये ? झालें ! या विचारानें उचल खाल्ल्याबरोबर तो तेथून निघून परत ' बॅथर्स्ट 'ला आला; व तेथील डोंगर फोडून पाहतो, तों तर्क केल्याप्रमाणें त्याला तेथेंहि सोनें असल्याचें आढळून आलें ! तेव्हां ' हारग्रेव्ह 'ला इतका आनंद झाला कीं, त्या आनंदाचे भरांत तो आपल्या बरोबरच्या मित्राला म्हणाला, " मित्रा ! या शोधाबद्दल आपली इतकी कीर्ति होणार कीं, आपणां दोघांना तर सरकाराकडून ' बॅरन् ' ' नाइट ' इत्यादि बहुमानाच्या पदव्या मिळतीलच; परंतु या माझ्या म्हाताऱ्या घोड्यालाही तो मेल्यावर त्याच्या अंगांत पेंढा भरून इंग्लंड-मधल्या अतिशय प्रसिद्ध वस्तुसंग्रहालयांत ठेवण्यांत येईल. " आणि " हारग्रेव्ह "ची ही अटकळ खोटी ठरली नाहीं. त्याचें, व त्यानें ज्या डोंगरांतून सोनें शोधून काढलें त्या डोंगराचें नांव जिकडेतिकडे झालें. आसपास राहणाऱ्या सर्व लोकांनीं आपा-पले धंदे सोडून दिले, व हातांत कुदळी, फावडीं, व घमेलीं घेऊन ते सोनें काढण्याकरितां या ठिकाणीं धांवले ! शेतकऱ्यांचीं शेतें ओस पडलीं, नावाड्यांच्या नावा नांगरून पडल्या, दुकान-दारांचीं दुकानें बंद झालीं, कचेऱ्यांतील कारकुनांनीं व अधि-काऱ्यांनीं आपापल्या नोकऱ्यांचा राजीनामा दिला, व पोलीस शिपा-यांनीं आपापल्या गेटांना रामराम ठोकला ! व शेवटीं बिचाऱ्या गव्हर्नराला स्वतःसच आपले बूट साफसूफ करावे लागले ! येवढेंच

नव्हे, तर ही बातमी इंग्लंडसारख्या दूरदूरच्या देशांपर्यंत हां हां म्हणतां पोंचून तेथूनहि लोकांच्या झुंडींच्या झुंडी 'सोनें' 'सोनें' करीत थेट ऑस्ट्रेलियांत लोटल्या! अर्थात् सर्वांनाच हा धंदा सारखाच मानवला असें नसून, कांहीं या धंद्यावर गब्बर होऊन तेथेंच राहिले, तर कांहींना हात हालवीत परत जावें लागलें! कांहींची 'लंकेंत सोन्याच्या विटा' यासारखी स्थिति झाली! सोनें मिळून उत्पन्न वाढलें, पण खर्चही त्याच प्रमाणांत वाढला! साध्या हजामतीलाही सोन्याची एक वीट पडूं लागली! मुलांनों, "हारग्रेव्ह" मोठा नशीबवान् खरा! आपणही यावेळीं तेथें असतों तर! पण जाऊं द्या.

वरील दोन्ही तिन्ही ठिकाणीं आपल्याला असें दिसलें कीं, तेथें सोनें प्रथम जमिनींत दडून पडलें असून, त्याचा थोडाथोडा सुगावा तेथील मूळच्या लोकांना लागत चालला होता; परंतु त्यांजपाशीं चांगलीं हत्यारें व यंत्रसामुग्री नसल्यामुळें, व सोनें गाळून शुद्ध करण्याचें ज्ञानही त्यांना नसल्यामुळें, जमिनींत गडगंज भरून राहिलेल्या सोन्याचा त्यांना फारसा उपभोग घेतां आला नाहीं; व त्या बिचाऱ्या सोन्याला जमिनींतून बाहेर येण्याकरितां युरोपमधून येणाऱ्या लोकांची वाट पहावी लागली! हे लोक लौकरच व्यापार, शेती वगैरे करण्याकरितां तेथें आले, व त्यांनीं आपल्या बुद्धीच्या व शक्तीच्या जोरावर मूळच्या लोकांची त्या त्या भागांतून हकालपट्टी करून सोन्याच्या जमिनी काबीज केल्या! पहा! संपत्ति असूनहि ती भोगण्यास अक्कल लागते!

लोखंड हें तुम्हांला सोन्यारुप्याइतकें किंमतीचें वाटत नाहीं; परंतु हल्लींच्या या यंत्रांच्या दिवसांत लोखंडाला इतकें महत्त्व येत चाललें आहे कीं, सोन्यारुप्यापेक्षांहि त्याची किंमत जास्त आहे

असें मानतात. एक वेळ सोन्यारुप्याशिवाय आपलें चालेल, परंतु लोखंडाशिवाय आपल्याला एक पाऊल देखील टाकतां यावयाचें नाहीं. आगगाड्या, आगबोटी, मोटारी, सर्व प्रकारचीं लहान-मोठीं यंत्रें, इमारती, कारखाने, व आणखीहि कितीतरी गोष्टी करतांना लोखंडाची गरज लागते. आणि अशाप्रकारें तें मनुष्याला अतिशय आवश्यक आहे म्हणूनच कीं काय, तें पृथ्वीवर बहुतेक सर्व ठिकाणीं थोड्या फार प्रमाणांत सांपडतेंच. परंतु त्यांतलेत्यांत तें अमेरिकेंतील युनायटेड स्टेट्स्, युरोपमधील इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत, व आशियांतील रशियांत फारच मोठ्या प्रमाणांत सांपडतें. आपल्या हिंदुस्थानांतही बंगाल, बहार, ओरिसा वगैरे प्रांतांत त्याच्या खाणी आहेत. सोनें जसें मातींत मिसळलेलें असतें, तसेंच लोखंडही जमिनींत कोळसा किंवा माती यांत मिसळलेलें असतें. हें मिसळलेलें लोखंड वेगळें करण्याची कृति फारच आश्चर्यकारक आहे. त्याच्याकरितां १००--१०० फूट उंचीच्या वाटोळ्या भट्या तयार करून त्यांत हें मातींत मिसळलेलें लोखंड भरतात, व खालून भट्या पेटवून देतात. आगीच्या भयंकर आंचेनें या मिश्रणांतील मातीचा किंवा कोळशाचा भाग जळून जातो, व शेवटीं शुद्ध लोखंड तेवढें शिल्लक राहतें. याचेंच पुढें पोलाद तयार करतात.

मुलांनो, लोखंड खाणींतून काढणें, तें भट्टींत घालून शुद्ध करणें, त्याचें पोलाद बनविणें, वगैरे कामें इतकीं आश्चर्यकारक आहेत, कीं त्यांची थोडीसुद्धां कल्पना माझ्या या सांगण्यावरून तुम्हांला आली नसेल. परंतु लोखंड हें सोन्यारुप्यापेक्षांहि जास्त उपयोगी आहे; तें जमिनींत कोळसा, माती वगैरेशीं मिसळलेलें असतें; तें शुद्ध करण्याकरितां भट्टींत तापवावें लागतें; इतक्या

गोष्टी जरी तुम्हांला सध्यां समजल्या तरी पुरे होईल. लोखंड व कोळसा हीं एकमेकांत मिसळलेलीं असतात. जेथें लोखंड सांपडतें, तेथेंच कोळसाहि सांपडतो. एवढेंच नव्हे, तर लोखंड व कोळसा यांचें एकमेकावांचून फारच अडतें. कोळसा नसता तर भट्टींत जळण काय घातलें असतें ? व मग लोखंड शुद्ध कसें करतां आलें असतें ? उलट लोखंडाचीं यंत्रें नसतीं, तर कोळसा तरी कसा काढतां आला असता ? आणि म्हणूनच हे दोन्हीहि पदार्थ ज्या देशांत एकत्र सांपडतात, तेच देश व्यापारांत व उद्योगधंद्यांत पुढें येतात.

मौज १४ वी.

समुद्रमंथन.

एकदा देव व राक्षस यांचेमध्यें 'जास्त बलवान्' कोण ? असा वाद लागला; आणि त्यांनीं त्या वादाचा निकाल समुद्र घुसळून लावावयाचा असें ठरविलें. समुद्र घुसळीत असतां कौस्तुभमणि, गाय, चंद्र, प्राजक्त, दारू, इ. वस्तु वर आल्या, व त्यांनाच आपण १४ रत्नें असें म्हणतों. वास्तविक पाहतां १४ पैकीं 'कौस्तुभ' मणि एवढेंच काय तें खरोखरचें रत्न आहे. बाकी सर्व साधे पदार्थच आहेत. तथापि त्यांचा मनुष्याला अतिशय उपयोग होत असल्यामुळें त्यांनाहि आपण रत्नेंच म्हणतों. मुलांनों, वस्तूचें मोल केवळ त्याच्या शोभेवर नसून त्याच्या उपयोगावरही आहे.

देव व राक्षस यांनीं एकदाच समुद्र घुसळला, व त्यांना १४ रत्नेंही एकदाच मिळालीं. आपण तर तो रोज घुसळत असून त्यांतून हजारों रत्नें बाहेर काढीत आहों. समुद्रांतून निघणारीं तुम्हांला माहीत असलेलीं रत्नें म्हणजे "**मोतीं**" व "**पोवळीं**" हीं होत. तुमच्या ६ वीच्या पुस्तकांत या रत्नांविषयीं बरीच माहिती दिली आहे, ती तुम्ही अवश्य वाचा. मोत्यासंबंधीं मुख्यतः एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, मोती हें शिंपल्यांत पडणाऱ्या एका पाण्याच्या थेंबापासून होतें अशी जी आपली जुनी कल्पना ती खरी नसून, तें व त्याचे शिंपले हीं दोन्हीहि कालव प्राण्याच्या पोटांतून निघणाऱ्या रसाचीं बनलीं असतात. अर्थात् या कालव

प्राण्यांना लागणारी हवा, अन्न व पाणी हीं ज्या ठिकाणीं मिळतात तेथेंच मोतीं सांपडणार हें उघड आहे. आपल्या हिंदुस्थानच्या दक्षिणेस सिलोनचे किनाऱ्यावर, व पश्चिमेस इराणचे आखातांत, तसेंच उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यांचे दरम्यानचे समुद्रांत, व जपान व ऑस्ट्रेलिया यांचे किनाऱ्यांवर कालवांस लागणाऱ्या सर्व गोष्टी असल्यामुळें तेथें मोतीं फार सांपडतात. मुलांनों, मोतीं काढणें हें अतिशय धोक्याचें आहे. जीव गुदमरण्याच्या भीतीपेक्षांहि समुद्रांत ज्या सुसरी किंवा मगर असतात त्यांचीच भीति पाणबुड्यांना अधिक असते. एकदा का मगरमिठी बसली म्हणजे मग कांहीं सुटण्याची आशा नको !

मोतीं कालव किड्याच्या अंगांतील रसाचीं बनलीं असतात, तर "पोवळीं" हीं दुसऱ्या एका प्रकारच्या किड्यांच्या हाडांचीं बनलीं असतात. हाडांचे बरेच ढीग मिळून पोंवळ्याचे खडक बनतात, व खडकांचींच पुढें बेटें बनतात. असले खडक व बेटें ऑस्ट्रेलिया खंडाचे आसपास पॅसिफिक व हिंदी महासागर यांत पुष्कळच आहेत.

"**मोती**" व "**पोवळीं**" हीं रत्नें अतिशय किंमतीचीं असलीं तरी त्यापेक्षां जास्त किंमतीचा समुद्रांत सांपडणारा पदार्थ म्हणजे मासा हा होय. काय! मोत्यांपेक्षांहि मासा जास्त मौल्यवान्? मुलांनों, आपल्या हिंदुस्थानांत तांदूळ, गहूं, ज्वारी वगैरे धान्यें व इतर भाजीपालाहि मुबलक होत असल्यामुळें, हिंदी लोकांचें माशांवांचून फारसें अडत नाहीं हें खरें. तथापि हिंदुस्थानांतहि मासे खाणारे बरेच लोक असून, किनाऱ्याकिनाऱ्यानें राहणाऱ्या लोकांचें मुख्य अन्न तर मासेच आहे. जगांतील लोकांचे जेवणांत मुख्य पोटभरीचे पदार्थ तांदूळ, गहूं, ज्वारी, मका, वगैरे धान्याचे

असले तरी त्यांच्या जोडीला मासे व मांस हीं असतातच. परंतु कांहीं देश तर असे आहेत कीं, तेथें तांदूळ, गहूं वगैरे धान्यें व मांस यांपैकीं कांहींहि मिळत नसल्यामुळें तेथील लोकांना आपली उपजीविका केवळ माशांवरच करावी लागते. ऊन व पाऊस पुष्कळ, व जमीन साधारण सुपीक असली, म्हणजे तेथें बहुतेक धान्यें होतात; व तेथील लोकांचें मुख्य अन्नहि तेंच असतें. ऊन व पाऊस हीं दोन्हींहि अतिशय, जमीन खोलगट, व हवा दमट असली कीं, तेथें मोठमोठीं जंगलें वाढतात; व तेथील लोक जंगलांत राहणाऱ्या मोठमोठ्या प्राण्यांच्या मांसावर आपली उपजीविका करतात. पाऊस फार कमी, व जमीन रेताड असते, तेथें बारीक गवत फार उगवतें; व अशा गवताचाच गाई, बैल, शेळ्या, मेंढ्या, हरणें, डुकरें, ससे, वगैरे लहान प्राण्यांना उपयोग होत असल्यामुळें, तेथें राहणारे लोक या प्राण्यांच्या मांसाचा उपयोग जास्त करतात. परंतु पृथ्वीवर अगदीं उत्तरेकडे असे कांहीं देश आहेत कीं, जेथें शेतें, जंगलें किंवा कुरणें यांपैकीं कांहींहि नाहीं. अशा देशांतील लोकांना शेजारच्या समुद्रावर सांपडणाऱ्या माशांशिवाय उपजीविकेचें दुसरें कोणतेंहि साधन नाहीं !

मुलांनों, माशांच्या असंख्य जातींपैकीं सामन्, हेरिंग्, कॉड, टॅबट् वगैरे महत्त्वाच्या आहेत. पैकीं सामन् हा दुर्मिळ व महाग असल्यामुळें फक्त श्रीमंत लोकांनाच त्याचा उपयोग होतो. सामान्य लोक हेरिंग्, कॉड वगैरे मासेच फार खातात. आपलेकडे लहान व अशक्त मुलांना कॉडलिव्हर म्हणून जें औषध देतात तें कॉड माशाचेंच असतें.

नद्यांच्या गोड्या पाण्यांतही मासे राहतात; परंतु बहुतेक मासे समुद्रांतच राहात असून त्यांपैकीं कांहीं किनाऱ्यावरच उथळ

पाण्यांत, तर कांहीं खोल पाण्यांत राहतात. उथळ पाण्यांत राहाणारे मासे तेथें वाढणाऱ्या वनस्पतींवर किंवा बारीक किड्यांवर उपजीविका करतात. समुद्राच्या खोल पाण्यांत सूर्यप्रकाश जाऊं शकत नसल्यामुळें, तेथें जिवंत प्राणी किंवा वनस्पती सांपडणें शक्य नसतें; व तेथील मासे तळाशीं बुडून मेलेलेच प्राणी खातात.

मासे अतीशय अंडीं घालतात. कॉड मासा तर कधीं कधीं ४० लक्षांपर्यंत अंडीं घालतो असें म्हणतात ! परंतु ते पाण्यांतच राहातात, व एकमेकांना खातात म्हणून ठीक आहे; नाहींतर मनुष्याला जमिनीवर राहण्याला जागा व खाण्याला अन्नच मिळालें नसतें ! कांहीं रानटी माणसें माणसांनाच खातात असें सांगतात. मासेहि अशाच प्रकाराचे आपल्याच भाईबंदांना खाणारे दुसरे प्राणी होत ! समुद्राच्या बहुतेक सर्व भागांत मासे मारण्याचा धंदा चालतो. परंतु त्यांतल्यात्यांत उत्तर अमेरिकेंतील सेंट लॉरेन्स नदीच्या मुखाशीं, उत्तर समुद्रांत नॉर्वे देशाचे किनाऱ्यावर व जपान बेटांचे भोंवतीं मच्छेमाऱ्यांचा धंदा फार चालतो. हिंदुस्थानांतही मद्रास, त्रावणकोर, व मुंबई येथील किनाऱ्यांवर मासे बरेच सांपडत असून, तेथेंहि मच्छेमारीच्या धंद्याला चांगलें रूप येत चाललें आहे.

मुलांनो मागील एका भागांत मी तुम्हांला मनुष्यानें जमिनीवर चालविलेल्या लुटालुटीविषयीं सांगितलें. मनुष्यानें पाण्यावरही अशीच लुटालूट चालविली आहे. परंतु आपण याला लुटालूट तरी कां म्हणावें ? ज्या ईश्वरानें मनुष्य प्राणी निर्माण केला, त्यानेंच


मनुष्याच्या पोटापाण्याची सोय लावण्याकरितां हीं दोन मोठमोठीं कोठारें निर्माण केलीं असून, त्याच्याच इच्छेप्रमाणें मनुष्य तीं कोठारें उपशीत आहे, असेंच आपण कां मानूं नये ? खरोखर ईश्वरी योजना मोठी अगाध आहे !

मौज १५ वी.

आकाशांतील जहाज.

मुलांनों, तुम्हांला मागील एका गोष्टींत वाळवंटांतील जहाजाबद्दल सांगितलें आहे. वाळवंट हें समुद्रासारखें खूप लांब रुंद असल्याकारणानें त्यांतून मनुष्याला वाहून नेणाऱ्या उंटालाच आपण जहाज म्हटलें. आकाश हेंही समुद्राप्रमाणेंच-खरें पाहिलें असतां समुद्रापेक्षांही जास्त—जिकडे तिकडे पसरलेलें असल्याकारणानें, त्यांतून वाहून नेणाऱ्या साधनालाही आपण मजेनें जहाज म्हटलें तर काय बिघडलें! आकाशांतील जहाजही वाळवंटावरील जहाजाप्रमाणें एखादा प्राणीच असेल काय ? राम रावणाला मारून व सीतेला घेऊन लंकेहून अयोध्येला आले, ते पुष्पक नांवाच्या विमानांतून आले असें तुम्हीं रामायणांत ऐकलें असेल, किंवा भगवान विष्णूही गरुडाच्या पाठीवर बसून आकाशांत इकडेतिकडे संचार करीत असत असें तुम्हीं पुराणांत ऐकलें असेल. मनुष्यालाही विष्णूप्रमाणेंच गरुडासारख्या एखाद्या पक्षाच्या पाठीवर बसून आकाशांत इकडे तिकडे जातां येतें तर काय मजा झाली असती! हें काम करण्याकरतां खरोखरचा एकादा गरुड किंवा आणखी एकादा पक्षी जरी अद्यापि मनुष्याला सांपडला नाहीं, तरी त्यानें आपल्या बुद्धीनें एक पक्ष्यासारखें यंत्र बनविलें आहे. पक्ष्याला पंख असतात तसे याही यंत्राला पंखासारखे दोन पंख असतात; त्याला पंखे म्हणतात येवढेंच. जमिनीवरून उडण्याला, हवेंत संथ तरंगण्याला आकाशांत निरनिराळ्या ठिकाणीं खालींवर जाण्याला, किंवा वरून

जमिनीवर एकदम झांप घालण्याचे कामाला पक्ष्याला पखांचा जो उपयोग होतो तसाच उपयोग या यंत्राला त्याच्या पंख्यांचा होतो. पक्ष्याच्या शरीराच्या इतर भागाची जी रचना किंवा जो आकार असतो, तीच रचना व तोच आकार या यंत्राच्या मधल्या भागाचाही असतो.



आकाशांतील जहाज.

मुलांनों, या यंत्राला काय म्हणतात तें तुम्हीं आतां ताडलें असेलच. त्याला आपण विमान म्हणतों; परन्तु इतर लोकांनीं त्याला 'बलून' किंवा 'झेपेलिन' किंवा 'एअरोप्लेन' किंवा 'एअरशिप' अशीं निरनिराळीं नांवें निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या कारणांनीं दिलीं आहेत. हीं कारणें, किंवा त्या त्या यंत्रांची निरनिराळी रचना मी तुम्हाला सांगत बसत नाहीं. बलून म्हणजे एक प्रकारचा फुगा किंवा बुडबुडा असून त्या नांवावरूनच विमानाच्या मूळच्या आकाराची व रचनेची तुम्हांला थोडीशी

कल्पना येईल. झेपेलिन हें, विमानाच्या मूळच्या रचनेंत बरीच सुधारणा करून, नवीन विमान बनविणाऱ्या एका जर्मन मनुष्याचें नांव असून त्यानें बनविलेल्या विमानालाही झेपेलिन् असेंच नांव मिळालें आहे. एअरशिप या शब्दाचा अर्थ तर 'आकाशांतील जहाज' असाच आहे.

पाण्यापेक्षां हलके असणारे पदार्थ पाण्यावर तरंगतात, आपणांला हातापायांचे साहाय्यानें पोहतां येतें, व पक्ष्यांना पंखांच्या योगानें हवेंत उडतां येतें, या दोनतीन गोष्टींमुळें मनुष्याला विमानांतून हवेंत उडण्याची कल्पना सुचली असावी असें म्हणतात; पाण्यापेक्षां हलके पदार्थ त्याच्यावर तरंगतात. मनुष्य पाण्यांत पोहतांना आपले हातपाय हलवितो, किंवा पक्षीही हवेंत उडतांना आपले पंख हलवितात; या गोष्टी लक्षांत घेऊनच विमानाची रचना केली आहे. विमान हवेपेक्षां हलकें केलें आहे व त्याला पंखासारखी युक्ति केली आहे हें मी मागें सांगितलें आहे.

मुलांनों, खुद्द विमानासंबंधीं यापेक्षां जास्त स्पष्ट कल्पना मला तुम्हांला आतां देतां यावयाची नाहीं. ती तुम्हांला पुढें होईलच. परन्तु विमानांतून जाणें येणें सध्यापेक्षां जास्त बिनधोक्याचें होऊन त्यांचा सर्रास उपयोग होऊं लागला म्हणजे त्यांचा किती उपयोग होईल याची कल्पना तुम्हाला आतांसुद्धां येईल. विमानांतून जाण्यायेण्याचे प्रयत्न आज जवळ जवळ पन्नास वर्षें होत असून, त्यांचा सर्रास उपयोग करण्यासारखी स्थिति आतां कोठें येत चालली आहे. इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचे दरम्यान पत्रांची नेआण करण्याच्या कामाला नुकतीच सुरवात झाली असून आतां कांहीं कांहीं प्रवाशीही विमानांतून इकडे तिकडे जाऊं येऊं लागले आहेत; परन्तु विमानाचा हा मार्गही पूर्णपणें सुरक्षित झालेला नाहीं.

महिन्या दोन महिन्यांनीं एखादें विमान तरी फुटल्याची किंवा खालीं आल्याची किंवा पेटून जळाल्याची बातमी येतच असते; परन्तु असे अपघात घडले म्हणून इंग्लिश लोक थोडेच माघार घेणार आहेत ! जमिनीवरून आगगाडी सुरू करतांना किंवा समुद्रांतून बोटी चालू करीत असतांना हजारों माणसें मेलीं. परन्तु शेवटीं त्यांनीं या दोन्ही मार्गांतले धोके काढून टाकून ते पूर्णपणें सुरक्षित केलेच कीं नाहीं ! हवेंतील मार्गाचेंही असेंच होईल. आणखी कांहीं दिवस कदाचित आणखी कांहीं अपघात होतील, परन्तु थोड्यांच दिवसांत विमानानें जाणें येणें हें आगगाडीनें किंवा आगबोटीनें जाण्यायेण्याइतकेंच बिनधोक्याचें होईल; आणि असें झालें म्हणजे आपणांस त्याचा खरा फायदा दिसून येईल. हल्लींपेक्षां प्रवास कितीतरी पटीनें कमी खर्चाचा, कमी वेळाचा व कमी त्रासाचा होईल. हल्लींच विलायतचीं पत्रें विमानांतून अवघ्या आठ दिवसांत येत असल्याचें तुम्हीं ऐकलें असेल. कोठें तीन आठवडे व कोठें आठ दिवस! पत्राप्रमाणेंच आतां लोकही विमानांतून येऊं जाऊं लागले असून त्यांचें हिंदुस्थानांतील चढाउतारावयाचें मुख्य स्टेशन कराची येथें आहे.

मुलांनों, माझें मला कांहीं सांगतां यावयाचें नाहीं, पण तुमच्या पैकीं कांहींजण तरी मोठेपणीं विमानांतून प्रवास कराल हें खास. हल्लीं कांहीं श्रीमंत माणसांच्या जशा स्वतःच्या मोटारी असतात त्याप्रमाणेंच पुढें श्रीमंत माणसें आपल्या स्वतःचीं विमानें ठेवतील व मग ते मनांत आणतील तिकडे थोडक्या वेळांत जाऊं शकतील. पुण्यांतील श्रीमंत मनुष्य आपल्या विमानांतून बसून सकाळीं निघेल, दहा वाजतां काशीस जाऊन गंगास्नान करील, काशीविश्वेश्वराचें दर्शन घेईल, तेथें जेवील व सुमारें चार वाजतां दुपारीं घरीं परत येईल !

सध्यां विलायतेंत श्रीमंत लोक स्वतांचीं विमानें ठेवून याप्रमाणें वाटेल तितके लांब जातात.

हल्लींच काबाली म्हणून मुंबईचे एक गुजराथी गृहस्थ आहेत, त्यांनीं स्वतःचेच विमानांतून हिंदुस्थानांत येण्याचा हिय्या केला. त्यांचेंहि विमान मध्यंतरींच नादुरुस्त होऊन त्यांना एका ओसाड जागीं उतरावें लागलें, व तेथें ते आजारी पडल्यामुळें त्यांना आपल्याच विमानांतून थेट येतां आलें नाहीं. परंतु त्यांनीं पुन्हां स्वतःच्या विमानांतून जाण्याचा बेत केला आहे असें ऐकतों. भले शाबास !

मुलांनों, तुमच्या सबंध वर्गाला पृथ्वीवरून विमानांतून हिंडवून आणलें तर काय मजा होईल नाहीं ? पृथ्वीवरील सगळ्या गोष्टी तुम्हांला प्रत्यक्ष दिसतील, आणि मग तुम्हाला देशांची किंवा शहरांचीं वर्णनें आतांप्रमाणें लोकांच्या तोंडून ऐकण्याचा किंवा पुस्तकांतून वाचण्याचा प्रसंग येणार नाहीं. आतांच या विमानांमुळें पृथ्वीवरील निरनिराळ्या भागांचे किंवा शहरांचे उंचावरून फोटो घेतां येत असल्यामुळें त्या त्या ठिकाणांची किती तरी चांगली कल्पना आपणाला येऊं लागली आहे ? लढाईच्या दिवसांत तर विमानांचा किती तरी उपयोग होईल ! कितीहि उंच तट किंवा रुंद खंदक असेनात, विमानापुढें त्यांचें कांहीं चालावयाचें नाहीं. विमानांतून एक बाँबगोळा खालीं टाकावयाचा अवकाश कीं—पण आतां जगांत लढाया करावयाच्या नाहींत, सर्वांनीं शांततेनें नांदावयाचें असें इंग्लंडचे मुख्य प्रधान, अमेरिकेचे प्रेसिडेंट व इतर प्रमुख राष्ट्रांचे मुख्य मुख्य लोक यांचें ठरलें असल्यामुळें लढाईचे कामीं विमानांचा किती उपयोग होईल याचा विचार करण्याचें कारणच नाहीं.

शेवट

मुलांनों, माझ्या या गोष्टी तुम्ही वाचीत असतांना तुम्हीं मजबरोबर सर्व जगभर प्रवास केला. प्रथम आपण हिंदुस्थानांतील लेणीं पाहिलीं. नंतर आपल्या देशाच्या पश्चिमेस असलेल्या अरबस्थान देशांत मीं तुम्हांस नेलें. तेथील उंट आपण पाहिले; नंतर अरबस्तानचे पश्चिमेकडील इजिप्त देशांत आपण गेलों. तेथील मनोरे पाहून आपणांस फार आनंद झाला. यानंतर आपण इजिप्तच्या दक्षिणेस असणाऱ्या कांगो नांवाच्या नदीच्या दाट अरण्यांत गेलों व तेथील बुटक्या व खुज्या लोकांची ओळख करून घेतली. यानंतर आफ्रिका खंडांतून आपण उत्तरेकडे वळलों व विलायतेला गेलों. तेथील राजधानीचें अफाट शहर लंडन हें आपण पाहिलें व तेथील ट्यूबच्या आगगाडींत बसून जमिनीखालून आपण प्रवास केला. एथें आपण फार वेळ थांबलों नाहीं. युरोपखंड सोडून आपण पश्चिमेकडे गेलों व अमेरिका खंडांत शिरलों. अमेरिकेंतील उंच उंच इमारती, तेलाच्या खाणी, पावसाचीं झाडें वगैरे गोष्टी पाहून आपणांस फार मौज वाटली. नंतर आपण अमेरिका खंडाच्या उत्तरेस असणाऱ्या एस्किमो लोकांच्या भेटीस गेलों व त्यांच्या बर्फाच्या घरांत थोडा वेळ राहून अमेरिका खंडास रामराम ठोकला. मग समुद्र ओलांडून आपण जपान देशांत शिरलों. तेथील माणसाच्या गाड्या पाहून जपानच्या पश्चिमेला असणाऱ्या चीन देशांत आपण प्रवास केला व चीनची अजस्र भिंत पाहून तो देश सोडला. नंतर दक्षिणेस लांब असलेल्या ऑस्ट्रेलिया खंडांत आपण शिरलों व तेथील कांगारू नांवाचे

चमत्कारिक प्राणी आपण पाहिले. नंतर पुन्हां आपल्या देशाकडे वळून आपण आपला प्रवास पुरा केला. अशा प्रकारें आपण पृथ्वीभोंवतीं एक पूर्ण प्रदक्षिणा केली.

या निरनिराळ्या मौजा पाहतांना आपण आशिया, आफ्रिका, यूरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशा पांच खंडांत गेलों होतों. पैकीं अमेरिका खंड येवढें मोठें आहे कीं, त्याचे दोन भाग करून उत्तरेकडील भागाला उत्तर अमेरिका, व दक्षिणेकडील भागाला दक्षिण अमेरिका असें म्हणण्याचा व हीं दोन स्वतंत्र खंडें आहेत असें मानण्याचा प्रघात आहे. तसेंच या खंडांत जातांना आपल्याला निरनिराळे समुद्र ओलांडावे लागले. प्रथम आपण आपला हिंदी महासागर ओलांडून भूमध्य समुद्रांत शिरलों. त्याच्याच दक्षिण व उत्तर किनाऱ्यांवर आफ्रिका व यूरोप हीं खंडें आहेत. यूरोपहून अमेरिकेंत जाण्याकरितां आपण अॅटलांटिक नांवाचा समुद्र ओलांडला; व अमेरिका खंडांतील निरनिराळ्या मौजा पाहून आपण जपानांतील रिक्षा व ऑस्ट्रेलियांतील कांगारू पाहण्याकरितां पॅसिफिक नांवाचा अतिशय मोठा समुद्र ओलांडला. या फार मोठ्या समुद्राशिवाय पृथ्वीच्या उत्तर व दक्षिण टोंकांस आणखीहि दोन मोठे समुद्र आहेत. त्यांचीं आर्टिक व अंटार्टिक महासागर अशीं नांवें आहेत. एस्किमो लोकांचीं बर्फाचीं घरें या आर्टिक महासागराच्या किनाऱ्यावरच असतात. हीं सर्व खंडें, त्यांतील महत्वाचे देश व निरनिराळे समुद्र या गोष्टी तुम्हांला सुरवातीच्या नकाशांत दाखविलेल्या दिसतील. मुलांनों, या सहा खंडांच्या मानानें हे सहा महासागर किती तरी मोठे आहेत ! आणि म्हणूनच सबंध पाणी हें संबंध जमिनीच्या ३ पट आहे असें म्हणतात. आतां मोठमोठ्या आगबोटी झाल्यामुळें व समुद्रांतून

जाण्यायेण्याचे रस्ते आतां सर्वांना माहीत झाल्यामुळें पृथ्वी प्रद-क्षिणा करणें आतां फारसें धोक्याचें राहिलें नाहीं. परंतु ज्यावेळीं आगबोटी नव्हत्या, व रस्त्यांसंबंधीं कांहींहि माहिती नव्हती अशा वेळीं, आपल्या लहान लहान जहाजांत बसून पर्वतासारख्या मोठ्या लाटांशीं व वादळांशीं लढून नवीन नवीन देश ज्यांनीं शोधून काढले अशा वास्को-ड-गामा, कोलंबस् यांसारख्या धाडसी लोकांच्या धैर्याची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच आहे. मुलांनो, या धाडसी लोकांच्या अद्भुत कथा फार गोड आहेत, त्या तुम्ही अवश्य वाचा.

मुलांनों, सर्व जगाचा प्रवास करून आपण थकलों आहों. प्रवासा-नंतर विसावा हा अवश्य पाहिजे. तो आतां आपण घेऊं या. जातां जातां तुम्हांला एक गोष्ट मला सांगावयाची आहे. ती तुम्ही अवश्य लक्षांत ठेवा. तुम्ही प्रवासवर्णनें व भूगोलविषयींच्या गोष्टी लक्षपूर्वक वाचीत जा म्हणजे तुम्हांला भूगोल विषय चांगला समजेल. जा आतां तुम्ही विश्रांति घ्या. कांहीं दिवसांनीं तुम्हांला आणखी एकदा प्रवासास नेण्याचें मी तुम्हांला वचन देतों व तुमची रजा घेतों.

लेखकः— ना. म. पटवर्धन.

आमची दिवाळी

प्रस्तावनालेखकः— प्रो. वा. म. जोशी

(एक भौगोलिक गोष्ट)

किंमत ६ आणे.

शाळाखात्याकडून बक्षीस व लायब्ररींकरितां मंजूर; कांहीं निवडक अभिप्रायांपैकीं कांहीं निवडक भागः—

प्रो. वा. म. जोशीः—" दिवाळी दसरा वगैरे आनंदोत्सव साजरे करण्याचा खरा मार्ग या लहानशा पण सुंदर गोष्टीवरून लहानांनाच नव्हे, तर मोठ्यांनाही समजण्यासारखा आहे. "

प्रो. म. रा. परांजपेः—" पुनः पुनः वाचावेसें वाटणें हें उत्तम पुस्तकाचें लक्षण मानलें तर प्रि. पटवर्धनांच्या ' दिवाळी 'ला अभिप्रायाची जरूरी नाहीं. 'आमची दिवाळी' मुलांचे हातांत पडली तर ती पुनः कपाटांत येण्याची आशा नको. कारण ती अनेकदां वाचल्यावरही पुनः पुनः वाचावीशी वाटते. "

ज्ञानप्रकाशः—[२१।३।३०] " या ७५ पानांचे पुस्तकांत सहज गप्पा मारतां मारतां अनेक वस्तूंसंबंधानें व प्रदेशांसंबंधानें जी मनोरंजक व उपयुक्त माहिती दिली आहे, ती कदाचित् शेंकडों पानांचें आणि याच विषयास वाहिलेलें असें पुस्तक वाचूनही मिळणार नाहीं. "

केसरीः—[२२।३।३०] " त्यांच्या संभाषणांत इंग्लंड, अमेरिका, जपान, जर्मनी, इजिप्त या देशांतील विविध माहिती प्रसंगानुरोधानें आली आहे, व ती मनोरंजक अशा सोप्या रीतीनें आणि त्यांच्या चिकित्सक बुद्धीचा विकास होईल अशा रीतीनें मांडिली आहे. मराठी भाषेंत या पद्धतीचें बालवाङ्मय ज्यास्त ज्यास्त निपजावयास पाहिजे. "